# मिरा भाईंदर महानगरपालिका
# स्थायी समिती सभा दि. १४/०७/२००६
# (दि. १४/०७/२००६ रोजीची तहकूब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. १४/०७/२००६ रोजीची तहकुब स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १४/०७/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. १०/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी १२.१० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १०) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ११) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १२) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| १५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या तहकुब सभेला सुरुवात करण्यात यावी अशी मी सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

साहेब, पान क्र .३ वर जो गाईचा विषय आलेला होता. मी त्याबाबत असे सांगेन की, मला गेले दोन महिने त्या गाई दिसलेल्या नाहीत. याचा अर्थ त्या गाई निघुन गेलेल्या आहेत असा झाला.

**सुर्यकांत भोईर :-**

माझ्या वॉर्डमध्ये भाईंदरचा रस्ता आहे. तिथे प्लेझेंट पार्कच्या समोर म्हशी बांधलेल्या होत्या. म्हणजे फुटपाथवर तबेले चालू झालेले आहेत का?

**गजानन भोईर :-**

तुम्ही तशी तक्रार करा. मग ही लोक सगळे काढून घेऊन जातील.

**प्रभात पाटील :-**

पान क्र.३ वर जे गॅरेज आहे. ते गॅरेज तिथुन हलत नाही. तिथे वीजेचे मोठे टॉवर आहे. त्याच्या बाजुला गॅरेज आहे आणि त्या गॅरेजने संपूर्ण परिसर व्यापलेला आहे. तो कोण गॅरेजवाला आहे? ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. पानपट्टे साहेब, त्या गॅरेजवाल्याला काही शिस्त वगैरे आहे की नाही. रोडवर तबेलेसुध्दा चालू झालेले आहेत. त्या गाईचे सकाळी व संध्याकाळी दुध काढतात आणि त्या गाई सोडून देतात. तुम्हाला अधिकारी व कर्मचाऱ्यांना ते दिसत नाही का?

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सर्वसाधारणपणे विचार करा की प्रत्येक मिटींग पासुन सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडमनी कमीत कमी दहा वेळा गॅरेजचा विषय काढला असेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्या सर्व गाई उचललेल्या आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही आज संध्याकाळी माझ्या बरोबर चला. त्या गाई उचलल्या आहेत की नाहीत ते मी तुम्हाला दाखवतो. मी रात्री दोन वाजता बी.पी. रोडवरुन येत होतो. त्यावेळेला सगळ्या गाई गोडदेव नाक्यापासून फाटकपर्यंत जात होत्या. त्या कमीत कमी पंधरा ते वीस गाई होत्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही दिवसा फिरणाऱ्या गाईबाबत कार्यवाही करतो.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, त्या गाई रात्रीच्या वेळेला फिरत होत्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याकडे रात्रीच्या वेळेला फिरणाऱ्या गाईवर देखरेख करण्यासाठी स्टाफ उपलब्ध नसतो. त्यामुळे आपण रात्रीच्या वेळेला कार्यवाही करु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, कृपया अशाप्रकारचे उत्तर देऊ नका. आम्ही रात्री बघायला नाही अशी उत्तरे नको. शहरात ज्यांचे तबेले आहेत त्यांनी त्यांच्या गाई सांभाळाव्यात.

**मोहन पाटील :-**

तुम्ही तुमचा अधिकारी वर्ग या कामासाठी लावा.

**जयंत पाटील :-**

म्हणून हा अधिकारी वर्ग आहे तो अपल्या शहरातील असला पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. तुम्ही तुमच्या घरी निघुन गेले तर आम्हाला इकडे रात्री त्रास होतो. आम्ही तुमच्याबद्दल वाईट बोलत नाही. परंतु, गावदेवी मंदिराजवळ ५० गाई बसलेल्या असतात. अशी लोकांची तक्रार आहे.

**मिलन पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, तुम्ही त्या गॅरेजबाबत काय कार्यवाही करणार आहात? ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो अतिक्रमणचा विषय आहे. आम्ही अतिक्रमण विभागाला सांगु.

**मिलन पाटील :-**

जर तो अतिक्रमणचा विषय असेल तर तुम्ही त्यांना तसे आदेश द्या. तुम्ही असे बोलता मग सभासदाच्या बोलण्याला काही किंमत नाही का? मा. सभापती साहेब, तुम्ही रुलिंग देत नाही. म्हणजे काय चाललेले आहे?

**प्रभात पाटील :-**

माझ्याकडे गॅरेजची तक्रार आलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही गॅरेजचे काय करणार? तो निर्णय लावून टाका. त्यांच्या ज्या भावना आहेत त्या तुम्ही सांगा. कारण ते दहा वेळा तोच विषय काढतात.

**जयंत पाटील :-**

ह्या भावना त्यांच्या नाहीत. सर्व नागरिकांच्या आहेत. फक्त आम्ही आवाज उठवू शकतो.

**मिलन पाटील :-**

तुम्ही तिकडून जात नाही. तुम्ही येताना नवघरच्या रोडने न येता अलिकडच्या रोडने येता तुमचे त्या रोडला जाणे होत नाही.

**रतन पाटील :-**

या गाईसाठी कोंडवाडे आहेत का?

**गजानन भोईर :-**

उत्तनला कोडवाडे आहेत.

**कैलासबेन जानी :-**

पाणीपुरवठ्याचा विषयसुध्दा घ्या. मी कंप्लेंट केली होती त्याचे काय झाले?

**प्रभात पाटील :-**

मी सभागृहाला सांगु इच्छिते की, टोचणगाडी येईपर्यंत ते गॅरेज तिकडून हलणार नाही. आपल्याकडे टोचण गाडीचे टेन्डर येईपर्यंत आपण थांबुया.

**संजय तायशेट्ये :-**

आपल्याकड टोचन गाडी आहे.

**मोहन पाटील :-**

टोचन गाडी चालू आहे आणि उपलब्धसुध्दा आहे. परंतु, ती आपल्यासाठी आहे. परंतु, ती गाडी आपल्याकडे नाही.

**प्रभात पाटील :-**

हे सिनियर अधिकारी काय उत्तर देतात ते बघा.

**मिलन पाटील :-**

हे सांगतात टोचन गाडी उपलब्ध आहे आणि ते टोचन गाडी उपलब्ध नसल्याचे सांगत आहेत.

**संजय तायशेट्ये :-**

टोचन गाडीचे टेन्डर आहे आणि कामसुध्दा चालु झालेले आहे.

**रतन पाटील :-**

ह्याच्यापुर्वी टोचन होते. त्यानेच गाड्या उचलल्या होत्या.

**मिलन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, ह्याच्यापुर्वी टोचनचे टेन्डर होते का? तुम्ही ज्या गाड्या उचलतात, त्या कोणत्या बेसवर उचलतात?

**संजय तायशेट्ये :-**

आपल्याकडे टोचनचे टेन्डर काढलेले आहे आणि त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मागील वर्षी दोन-तीन वेळा मा. सभापती साहेबांनीसुद्धा हे सांगितल होत की मागे जो टेम्पो स्टँड त्याचे काय करायचे? अजुन टेम्पो आहेत तसेच आहेत. एक सिंगल गाडीसुद्धा जात नाही. एक बस आली तर सर्व मागे ट्रॅफिक जॅम होते.

**रतन पाटील :-**

डिव्हायडर लावण्याचे रस्त्याचे काम कशाला थांबवले?

**प्रेमनाथ पाटील :-**

रस्त्याला डिव्हायडर बसविण्याचे काम चालू आहे.

**मोहन पाटील :-**

टेम्पो उचलत का नाहीत? हा विषय महत्वाचा आहे. टेम्पो का हटवत नाही? ह्याचे कारण काय आहे? ट्रॅफिक किती होते?

**मा. सभापती :-**

टेम्पोवाल्यांची मिटींग घेतली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थायी समितीने निर्णय दिल्याप्रमाणे टेम्पो हटवण्यासाठी सर्व टेम्पो असोसिएशनची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये स्थायी समितीचे पदाधिकारीसुद्धा उपस्थित होते. त्यांच्याशी खूप विचार विनीमय केला. त्यांनी जागा पाहण्याचे आणि जागा दाखवण्याचे निर्देश त्या बैठकीत देण्यात आले होते. त्यांना जागा दाखविल्यानंतर तिथे स्थलांतर करणार होते. दरम्यानच्या काळामध्ये त्यांना जागा दाखवुन दिली. त्यांची बैठक घेतलेली होती. परंतू, त्यांनी अपेक्षित सहकार्य दिलेले नाही. त्या अनुषंगाने प्रशासनाने पोलिसांना तसे कळविलेले आहे. येणाऱ्या काळामध्ये पोलिस बंदोबस्त घेउन त्यांचे तिथे स्थलांतर करण्यात येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

काशिमीरा नाक्यावर पेट्रोल पंपाच्या इथे जो टेम्पो स्टँड आहे तो ही हटविण्यात यावा. ते हायवे वर आहे. तिथे ॲक्सिडंट होतात. त्यांना खालच्या रोडवर घ्या.

**मोहन पाटील :-**

तो विषय पुढच्या मिटींगला सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही काशिमीरा नाक्याच्या टेम्पो स्टँडचा विषय पुढच्या वेळेला घेऊन या.

**मा. सभापती :-**

आम्ही पोलिसस्टेशनला पत्र पाठविलेले आहे. सद्या पोलिसांची तारांबळ चाललेली आहे. आपण पोलिस स्टेशनला जाऊया आणि प्रत्यक्ष जाऊन भेटुया. त्यांना प्रत्यक्ष सांगु या की, सर्व गाडया हटवा. कारण त्याच्यामुळे रस्त्यावर ट्रॅफिक जॅम होते.

**रतन पाटील :-**

तीन महिन्यापासून हा विषय सांगितला होता. परंतू, विषय आलेला नाही.

**मा. सभापती :-**

परंतू, आठ दिवसापूर्वी पत्र दिले होते.

**मिलन पाटील :-**

मानिनय सभापतींच्या परवानगीने बोलत आहे. आपला आता टोचनचा विषय झाला आणि आता आपण टेंडर काढलेले आहे. ही रु. ३००/- ची रिसीट आहे आणि वर काही पैसे घेऊन असे हे चालते. ते रिक्षा व स्कुटरचे आहे. स्टेशनला स्कुटरचे रु. ३००/- वसुल केले होते. तुमच्या जवळ ते पैसे जमा आहेत का?

**सुर्यकांत भोईर :-**

मुंबईला रु. २००/- घेतात.

**मिलन पाटील :-**

आपण टेन्डर काढले नाही आणि या रिसिट फाडल्या जातात. या रिसिट खऱ्या आहेत की बोगस आहेत ते बघा. ही त्याची पावती आहे. ही बोगस पावती आहे की सत्य आहे ती चेक करा. हे काय चालले आहे ते बघा. आपण आता टेन्डर काढलेले आहे. परंतु, त्याचे टेन्डर अजुनपर्यंत आलेले नाही. ह्याच्यापुर्वी टेन्डर होते की नाही? काय वसुल करायचे? लाखो-करोडो रुपये वसुल केले आहेत ते बघा. जी टोचनची गाडी रु. २० हजारामध्ये येते त्याच्यावर लाखो रुपये गोळा झालेले आहेत.हा पैसा गोळा केला त्याला कोणी अधिकार दिलेला आहे. हा विषय आता आलेला आहे. म्हणून मी त्याला आता टेन्डर काढण्याबाबतचे विचारुन कन्फर्म करुन घेत होतो. हे टेन्डर आता काढलेले आहे. परंतु, ह्याच्यापूर्वी काय होत होते? ह्याच्यावर रुलिंग द्या. ह्याच्यावर दखल घ्या. जर अशाप्रकारे ही नगरपालिका चालत असेल तर आम्ही चालून देणार नाही. कोणाचे पैसे आहेत? तुम्ही बोलता ते आहे की आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं असे चाललेले आहे.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. ८ वर शंकराचे मंदिरासमोरील स्टॉल हटविण्याबाबत लेखी तक्रार केलेली होती. त्याचे काय झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

पान क्र. ९ वर आम्ही एक ठराव मांडलेला होता.

**केशव घरत :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण पदोन्नतीसाठी कर्मचारी वर्ग-१ आणि वर्ग-२ ह्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रोसिडिंगचे वाचन झाल्यानंतर माहिती देऊ की आता माहिती देऊ.

**केशव घरत :-**

आता माहिती द्यायची असेल तर आता द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला एका विषयावर बोलायचे आहे आम्ही एक ठराव मांडलेला होता. आम्हाला दुरुस्तीमध्ये त्याबाबत बोलायचे होते. आपणसर्व महिलांचा आभ्यास दौरा करणार होतो. दौऱ्याचे काय झाले? त्या महिला दौऱ्याला गेल्या की नाही? हे विचारायचे होते. मला प्रोसिडिंगमध्ये तो विषय कॅन्सल करुन टाका. कारण तो दौरा झालेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

महिलांचा दौरा झालेला नव्हता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणताही दौरा झालेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

महिला व बालकल्याण समितीचा दौरा झालेला नाही. फक्त त्यावेळेला पैशाची मंजुरी मिळालेली होती. त्यामुळे आम्ही प्रोसिडिंगमधील या विषयाला मंजुरी देऊ शकत नाही. मग ते कॅन्सल करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणतेही दौरे झालेले नाहीत.

**नगरसचिव :-**

महिला व बालकल्याण समितीचा ठराव झालेला होता.

**मोहन पाटील :-**

आता या गोष्टीला किती महिने झालेले आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याला तीन महिने झालेले आहेत.

**नगरसचिव :-**

हा विषय पुन्हा घ्यावा लागेल.

**मोहन पाटील :-**

असा दौरा झालेला नाही. असा पुन्हा विषय घ्या आणि त्याची प्रोसिडिंगमध्ये नोंद करुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

पान क्र.११ वर बघा. दुरुस्ती करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

केरळ आणि आपला दौरासुध्दा आयोजित केलेला होता. कुठला अंदमान - निकोबारचा दौरासुध्दा कॅन्सल झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्याचा निर्णय स्थायी समितीमध्ये होणे आवश्यक आहे. कारण सगळे निर्णय महासभेकडे पाठविले जातात. म्हणून मी बोलते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणत्याही ठरावाला इम्प्लीमेन्टेशन व्हायला किंवा कॅन्सल व्हायला तीन महिन्याचा कालावधी लागतो.

**दिपक खांबित :-**

आपण वेगळा ठराव करण्यासाठी इथे परमिशन घेऊ शकतो का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण वेगळा ठराव करु शकत नाही. कारण जाणारे तेच सदस्य असतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पान क्र. १७ मध्ये तेच वाक्य आहे. सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचे वाक्य आहे की अंदमान-निकोबारचा खर्च वेगळा राहील आणि कधी ठरेल त्याच्या एक महिन्यापूर्वी टिकीट घ्यायला पाहिजे. याचा अर्थ हा खर्चसुध्दा करावा लागणार आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दौऱ्याबाबतचे जे काही ठराव आहेत त्याच्या विहित मुदतीनंतर आपल्या सुचनाप्रमाणे दौरा रद्द करण्याचा प्रस्ताव आणला जाईल.

**रतन पाटील :-**

आपण जकातीच्या संदर्भासाठी जी मिटींग घेतलेली होती. आपण त्यांच्याशी संपर्क करुन त्याला बोलावणार होतात. त्याबाबत काय झाले? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक करोड बासष्ट लाखाचे मॅटर होते. त्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता या ठिकाणी तो विषय नाही. तो विषय खाजगी आहे.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. २५ वरील बायोगॅस प्रकल्पाबाबत काय झाले? त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकले का? ते टेन्डर हे झालेले होते. पान क्र.२५ वर बघा. मॅन्युअल इंजिनियरिंगने जे टेन्डर भरलेले होते. त्यांनी आपल्याला प्रतिसाद दिलेला नव्हता. त्याचे काय झाले? त्याला आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार आहोत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचं डिपॉझीट जप्त केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मला पान क्र. ३६ बाबत बोलायचे आहे.

**नगरसचिव :-**

तुमची पान क्र. ३६ वर काही दुरुस्ती आहे का?

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, नवघर मराठी शाळेसमोरच्या टपऱ्या उचलण्याच्या संदर्भात आपले ठरलेले होते. आपण त्या टपऱ्या उचलल्या का?

**गजानन भोईर :-**

आता आणखी दोन टपऱ्या पडलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

नवघर मराठी शाळेजवळच्या टपऱ्या उचलण्याच्या संदर्भात सर्वांनी एकमुखाने सांगितलेले होते की एकही टपरी ठेऊ नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तो झुणका भाकर केन्द्रवाला एकदम मैदानात गेलेला आहे.

**जयंत पाटील :-**

झुणका भाकर केन्द्र मागुन वाढत आहे आणि टपऱ्या पुढून वाढत आहेत. मा. उपायुक्त साहेब, आपण मागच्या वेळेला टपऱ्या उचलण्याबाबत ठरविलेले होते. त्यामुळे त्या सगळ्या टपऱ्या काढून टाका. एकही टपरी ठेवू नका.

**गजानन भोईर :-**

जर सांगून ती लोक ऐकत नसतील तर हा विषय महासभेत जाऊन त्याच्यावर निर्णय होऊ दे.

**प्रभात पाटील :-**

झुणका भाकर केंद्राने किती तरी जागा व्यापलेली आहे. आतमध्ये जाऊन बघा. ते झुणका भाकर केंद्र नवघर ग्राउन्डमध्ये आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

नवघर ग्राउन्डमध्ये त्यांच्या टपऱ्या लावलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

तिथे झुणका मिळत नाही की भाकर मिळत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, त्या ठिकाणी दारु मिळते.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्या हद्दीमध्ये जेवढी झुणका-भाकर केंद्र आहेत. ती सगळी बंद करुन टाका.

**रतन पाटील :-**

तुम्ही झुणका-भाकर केंद्र बंद करु शकत नाही. ते महाराष्ट्र शासनाचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याकडे जेवढी झुणका-भाकर केंद्र आहेत ती बंद करायची.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, जास्त बोलू नका. आमच्या श्री. गणेश नाईक साहेबांनीच त्यांना जागा दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

परंतु, ती झुणका भाकर केंद्र आता आमची आहेत.

**मोहन पाटील :-**

आताही झुणका भाकर केंद्र तुमचीच आहेत.

**जयंत पाटील :-**

ती झुणका भाकर केंद्र पोट भरण्यासाठी दिलेली आहेत.

**मोहन पाटील :-**

जर झुणका भाकर केंद्राला अडचणी येत असतील. झुणका-भाकर केंद्र असल्यामुळे नवघर प्राथमिक शाळेला अडचण येते. आपण अशी जागा मिरारोड पोलिस स्टेशन आणि नवघरमधील समाजमंदिरला आपण जागा दिली तर त्यांनी ती जागा पूर्णपणे ताब्यात घेतली. तिथे नागरी सुविधा असली तरी त्यांनी तुमच्या मुलभूत हक्कावर गदा आणलेली आहे. म्हणजे मिरा रोड पोलिस स्टेशनच्या माध्यमातून आपल्या मुलभूत हक्कावर गदा आणलेली आहे. त्या दृष्टीकोनातुन त्या ठिकाणी जर जागा अव्हेलेबल होत असेल तर ती जागा आपलीच आहे. तर ती जागा शाळेला द्यायला कमी पडत आहे. म्हणून झुणका-भाकर केंद्राच्या संबंधीतांना आपल्याकडे बोलवा. ती जागा घेता येत असेल तर प्रशासनाने त्यासाठी पुढाकार घ्यावा.

**जयंत पाटील :-**

ह्याच्याकडून एक गोष्ट अशी आहे की तुम्ही झुणका भाकर केंद्राला किती स्क्वेअर फुट जागा दिलेली आहे? ते सांगा. झुणका भाकर केंद्राबाबत शासनाचे नियम आहेत की कमी जागेत झुणका भाकर केंद्र द्यायचे. परंतु, आता किती जागा दिलेली आहे? ते बघून घ्या.

**प्रभात पाटील :-**

जिथे झुणका भाकर केंद्र आहे. त्या ठिकाणी हॉटेल बांधलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

शासनाकडून किती बाय कितीचे झुणका भाकर केंद्र आहे. तुमच्याकडे त्याची मंजुरी असते.

**मोहन पाटील :-**

तुम्ही प्रथम मूळ जागा केवढी आहे. ती बघा आणि जर मूळ जागा जेवढी असेल आपण तेवढी जागा परत देऊन टाकायची. जे सगळे झुणका भाकर केंद्र स्वतः मिरा भाईंदर परिसरात राहणार आहेत. त्यांनाही शाळाविषयी आस्था आहे.

**प्रभात पाटील :-**

आमदार निधीतून व्यायामशाळा बांधली होती. सध्या तिथे नवघर चौकी आहे. ती जागा मोकळी होती म्हणून नवघरच्या ग्राउंडमधून ते पोलिस हलत नव्हते. म्हणून आपण त्यांना तिथे शिफ्ट केले. आपण आपली व्यायामशाळा त्यांना दिली कारण आपल्याला पाण्याची टाकी तिथे बांधायची होती. नवघरच्या ग्राउंडमध्ये पाण्याची टाकी प्रपोज केली होती. तिथे टाकी होण्यासाठी आपण त्यांना शिफ्ट केले. नाही तर ते तिथुन हलत नव्हते. आज त्यांनी एवढा मोठा भुखंड खाल्लेला आहे. की आपण तिथे काहीही करु शकलो नाही. आपली ती चांगली आणि मोक्याची जागा होती. खूप मोठी बिल्डींग बांधली. त्या बिल्डींगला भलतेच नाव दिले. पोलिस आपला उपक्रम आहे. आपल्या सोयीसाठी आहे. नाव कोणाच, गाव कोणाचं. आपल्या हातून एवढा मोठा भुखंड

गेलेला आहे. आणि आता राहिलेल्या ग्राउंडमध्ये अर्धेअधिक ग्राउंड झुणका - भाकर केंद्रवाल्यांनी भरलेले आहे आणि त्याच्यापलिकडे जाउन सांगेल की हा विषय नेहमी येतो. सन्माननीय सदस्य मिलन पाटील नेहमी माझ्याबाजूने बोलतात मी त्यांचे आभार मानते. तुंम्हाला मी आधीच सांगितले होते की चर्मकारांचा जो स्टॉल नवधर रोडला लागून आहे तो भरपूर आतमध्ये घुसलेला आहे. ते सन्माननीय सदस्य जयंत पाटील यांना विचारा. त्यांने अर्धा स्टॉल नवधर शाळेच्या ग्राउंडमध्ये वाढवलेला आहे.

**मिलन पाटील :-**

तो एक स्टॉल आहे आणि शिवाजीच्या पुतळ्या समोरच्या स्टॉलबाबत आम्ही दरवेळेला सांगत असतो. एकदम रस्त्यावरच आहे. सगळे लोक रस्त्यावरुन जातात. परंतु, एकालाही हिंमत होत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, शिवाजीच्या पुतळ्याकडेसुद्धा चर्मकाराचा स्टॉल आहे.

**मिलन पाटील :-**

तो स्टॉल शिवाजीच्या पुतळ्यासमोरचा स्टॉल एकदम रस्त्यावरच आहे. सगळेजण त्या रोडने जातात. परंतु, कोणालाही त्या स्टॉलबाबत कार्यवाही करण्याची हिंमत होत नाही.

**प्रभात पाटील :-**

महापालिका चांगल्या गोष्टीसाठी लक्ष का देत नाही?

**मिलन पाटील :-**

ते स्टॉल उचलायला काणाचीही हिंमत होत नाही. आम्ही इकडे प्रत्येक वेळेला ओरडायचे का?

**प्रभात पाटील :-**

आपल्याला एखाद्या बिल्डरला वाचवायचे नाही का?

**मिलन पाटील :-**

शासनाने त्याला रस्त्यामध्ये स्टॉल वाढवून देण्याची परमिशन दिलेली आहे का?

**प्रभात पाटील :-**

एखाद्या नगरसेवकाने असे केले असते तर आपण त्याच्यावर हातोडा चालवला असता. परंतु, तुम्ही सर्वसामान्य माणसावर काहीही कार्यवाही करित नाही.

**रतन पाटील :-**

महापालिकेने त्यांना रस्त्यावर बसण्याची परवानगी दिलेली आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

अशी कुठल्याप्रकारे परवानगी दिलेली आहे? ते सांगा.

**रतन पाटील :-**

साहेब, अशी परवानगी कुठल्याप्रकारे दिलेली आहे? ते तपासा.

**प्रभात पाटील :-**

साहेब, जर पंधरा दिवसामध्ये झुणका भाकर केंद्राबाबत कार्यवाही झाली नाही तर मैदान खाली करावे लागेल.

**मिलन पाटील :-**

या चर्मकारांचे जे अध्यक्ष माननिय उपमहापौरसाहेब आहेत. आमच्याकडे सगळयाचा रजिस्टर नंबर असतो.

**एस्. ए. खान :-**

चर्मकारांनी सर्व स्टॉल असेच कुठेही टाकलेले आहे.

**रतन पाटील :-**

चर्मकारांनी असेच सगळीकडे स्टॉल असेच टाकलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

झुणका भाकर केंद्रामध्ये फक्त दारु व मटन मिळते. तिथे झुणका नाही की भाकरी नाही.

**एस्. ए. खान :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही स्मशानभुमीला परवानगी आहे का बघा.

**नगरसचिव :-**

तुम्ही तशी मागणी करा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आमच्या सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्या राज्यात सुध्दा ठरावाच्या अंमलबजावणीचा एकही कार्यक्रम झालेला नव्हतो. आता तुमचेही राज्य संपत आलेले आहे. त्यामुळे कमीत कमी एकतरी मिटींग ठरावाच्या अंमलबजावणीची लावा. नाहीतर तुमचाही कार्यकाल निघून जाईल. सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचा कार्यकाल संपून गेलेला आहे. त्यांनीही मिटींग लावली नाही. ज्या ठरावाची अंमलबजावणी व्हायला पाहिजे ती झाली नाही. तुमच्या कार्यकालात तरी होऊन जाऊ द्या. तुमचा कार्यकाल झाला तर हरी ओम विठ्ठल. दोन दिवस राहिलेले आहेत. मिटींग होतील जेमतेम दोन मिटींग होतील. त्यातला

एक तरी लावा. तुम्ही अधिका-यांना काहीतरी शिकवायला पाहिजे. आपण एक मिटींग घेऊ दोन मिटींग घेऊ परंतु, ठरावाची अंमलबजावणी झाली पाहिजे. कितीवेळा मी बोललो आहे. आता तुमचे किती महिने राहिलेले आहेत ते बघा.

**रतन पाटील :-**

या विषयाचे गांभीर्य लक्षात घ्या आणि काय करता येईल? ते करा.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही कुत्र्यांच्या निविदा काढता. ते रस्त्यावर मोकाट फिरतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझी त्याच्यावर चर्चा झाली कुत्रे सोडायला जागा नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, दुसरा विषय असा आहे की स्टॉल उचलला आहे की नाही. तुम्ही याचे रुलिंग द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

भाजी मार्केटमध्ये जे झुणका-भाकर केंद्र आहे. तिथे सेक्सी बार चालवला जातो. तिथे खुलेआम दारु आणि मच्छी, मांस मिळते. तिथे झुणका आणि भाकरी काहीही मिळत नाही.

**रतन पाटील :-**

तिथे धाड टाका.

**सुर्यकांत भोईर :-**

दहिसर चेकनाका आणि वर्सोवा ब्रीजमध्ये तिथेसुध्दा तेच चालते.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर तुमच्याच गोल्डन नेस्टच्या रोडला रयत महासंघ स्टॉल म्हणून एक मोठा स्टॉल आहे. आपण त्याला परमिशन दिलेली आहे का? म्हणजे भाईंदर मध्ये कोणीही येऊन काहीही करावे असे आहे का?

**मा. सभापती :-**

तुम्ही हा विषय सविस्तरपणे पुढच्या वेळेला घ्या आणि त्याच्यावर चर्चा करा.

**प्रभात पाटील :-**

साहेब, तुम्ही नवघर शाळेविषयी निर्णय घ्या.

**गजानन भोईर :-**

आताच्या आता कोणाला तरी त्या मैदानातील अतिक्रमण हटवायला पाठवा. कशाला तोच तोच विषय पुन्हा-पुन्हा आणता?

**प्रभात पाटील :-**

नवघर शाळेत चर्मकांरानी मैदान व्यापलेले आहे.

**एस्. ए. खान :-**

तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**मोहन पाटील :-**

झुणका-भाकर केंद्राचा विषय पुढच्या सभेत घेण्यापेक्षा या सभेतच आला पाहिजे होता. तुम्ही हा विषय पुढच्या सभेत घ्या. त्याची रितसर माहिती मागवून घ्या. शासनाचे काय निर्देश आहेत? जागेची परिस्थिती काय आहे? काय विकले जाते? किती एक्स्ट्रा वाढवले आहे? त्याबद्दल माहिती काढा आणि सविस्तर घेऊनच या ठिकाणी विषय आणा.

**रतन पाटील :-**

झुणका-भाकर बरोबर टप-यांचाही विषय घ्या. दोन्ही एकत्रच विषय घ्या.

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ४५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

या ठरावात माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही पदोन्नतीबाबत काय सांगत होते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो) :-**

वर्ग १ आणि वर्ग २ च्या अधिका-यांना पदोन्नती दिलेली आहे. मागच्या सभेत मी तुम्हाला सुचित केलेले होते. की वर्ग ३ च्या अधिका-यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित जेष्ठता यादी आम्ही पुर्ण केलेली आहे. त्याची जी एक महिन्याची अपेक्षित मुदत असते. ती मुदतसुध्दा पुर्ण झालेली आहे. त्यामध्ये साधारण काही तक्रारी आलेल्या आहेत. त्याचे डिस्पोजल मा. आयुक्त साहेबांच्या समोर होणे अपेक्षित आहे. जर हे डिस्पोजल येणा-या हप्त्यात पुर्ण झाले तर उर्वरित अधिका-यांना जी जेष्ठता किंवा पदोन्नती द्यायची आहे. ती कार्यवाही पुर्ण होईल. ज्यांना बारा वर्षे पूर्ण झालेली आहे. त्यांनाच पदोन्नती द्यायची आहे ना. १२ वर्षाची मुदत सर्वांना लागू केलेली आहे. मागच्या सभेत मी पदोन्नतीचे काम पूर्ण करतो असे सांगितलेले

होते ते पूर्ण केलेले आहे. १२ वर्षाची पदोन्नती सर्वांना दिलेली आहे. प्रथम सफाई कामगारांना पदोन्नती दिलेली आहे. आणि नंतर अधिका-यांना दिलेली आहे. फक्त वर्ग ३ च्या पदोन्नती राहिलेल्या आहेत. आम्ही त्या येणा-या पंधरा दिवसात पूर्ण करु.

**रतन पाटील :-**

आपण मागच्या वेळेला स्थायी समिती किंवा महासभेमध्ये अग्निशमन दलाच्या पथकांना रजेचा पगार दिलेला होता. त्याचबरोबर अन्य अत्यावश्यक सेवेतील जे कर्मचारी काम करतात. त्यांनासुद्धा रजेचा पगार द्यावा आपण असा प्रस्ताव ठेवलेला होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

वॉटर डिपार्टमेन्टच्या व टॅक्सचा विषयसुध्दा महत्त्वाचा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो) :-**

दोन वेळेला 'ज' चा प्रस्ताव आलेला होता. त्याच्यामध्ये शासनाच्या स्पष्ट सुचना आहेत. आपण कर्मचा-यांसाठी पदाधिकारी सर्व स्तरावर दुमत नाही. आपण सर्व पाठीशी आहोत. आपल्याला नियमात बसण्याच्या बाहेर जितके कसोशीने देता येते तितके आपण कर्मचा-यांना दिलेले आहे. आणि त्याच रुपाने 'ज' चा प्रस्ताव दोन-तीन वेळेला सभागृहात येऊन गेलेला आहे. त्याचे कारण एकच आहे की कर्मचा-यांना पर्यायी सुट्टया द्याव्यात असे शासनाचे निर्देश असल्यामुळे ते करण्यास पुढे अडचण आहे. अत्यावश्यक सेवेला म्हणून अग्निशमन दलास रजेचा पगार दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, महापौर चषक आता होणार आहे का?

**प्रभात पाटील :-**

१३ जुलैला मॅरेथॉन स्पर्धा आहे अशी आजच्या पेपरला बातमी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

१३ जुलैला मॅरेथॉन स्पर्धा आहे. आमच्याकडे त्या मॅरेथॉनचा विषय आलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

१३ जुलै अशी तारिख लिहिलेली आहे आजचा महाराष्ट्र टाईम्स बघा. आज १४ जुलै तारिख आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आज १४ जुलै आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही महाराष्ट्र टाईम्स पेपर बघा.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या महाराष्ट्र टाईम्समध्ये १३ जुलै तारिख आहे.

**प्रभात पाटील :-**

१३ जुलै २००६ रोजी मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे असे आजच्या महाराष्ट्र टाईम्सच्या पेपरला आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही पेपर मागवा.

**प्रभात पाटील :-**

आज १४ जुलै तारिख आहे. आजचा पेपर आहे मी सांगते १३ जुलै २००६ ला होणार आहे. आणि आज १४ जुलै आहे. महाराष्ट्र टाईम्समध्ये असे आलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही पेपर मागवा.

**दिपक खांबीत :-**

मॅरेथॉन स्पर्धा १३ जुलै रोजी होणार नसुन दि. १३ ऑगस्ट रोजी होणार आहे. त्याची खरी तारिख १३ ऑगस्ट आहे.

**नगरसचिव :-**

पेपरला १३ जुलै चुकून आले असेल. खरी तारिख १३ ऑगस्ट आहे.

**मोहन पाटील :-**

श्री. खांबीत, तुम्ही चुकीची दुरूस्ती करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

परंतु, पेपरला १३ जुलै तारिख आलेली आहे. तुम्ही पेपर मागवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो) :-**

श्री. खांबीत, तुम्ही पेपरवाल्यांना चुकीची दुरुस्ती करायला सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅरेथॉनच्या विषयाचे काय करायचे?

**गजानन भोईर :-**

तुम्ही नवघर शाळेच्या विषय आला तर नवघर शाळा विकून टाका.

**मोहन पाटील :-**

आपण मॅरेथॉनला मंजूरी दिलेली आहे.

**प्रकरण क्र. ४५ :-**

दि. ०५/०५/२००६ (तहकुब) व दि. ०५/०५/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४७ :-**

दि. ०५/०५/२००६ (तहकुब) व दि. ०५/०५/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतांमध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

ती नवघर शाळा विकूनच टाका.

**गजानन भोईर :-**

त्या शाळेत जी मुले जातात. ती चिखलातून शाळेत जातात. ते त्या अधिकाऱ्याला दिसत नाही का? तुम्ही त्या अधिकाऱ्याला या ठिकाणी बोलवा. ते अधिकारी त्या शाळेत पाहणी करायला जातात की नाही ते बघायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्या शाळेजवळील टपऱ्या काढायला सांगा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही ती शाळा शिकण्यासाठी बांधलेली आहे की भाड्याने देण्यासाठी बांधलेली आहे ते प्रथम सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही ती सांगा तोडून तिथे अवाढव्य टॉवर बांधा म्हणजे ते दिसायला चांगले होईल.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही शाळा क्र. १३ बंद करा.

**सुर्यकांत भोईर :-**

कधी होमगार्डला देतात.

**गजानन भोईर :-**

त्या शाळेतील मुलांना शाळेत बसायला जागा नाही.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, हा विषय कोणी आणला? कोणत्या अधिकाऱ्याने आणला?

**नगरसचिव :-**

हा विषय प्रशासनाकडून मा. आयुक्तांकडुन आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तिथे होते का? त्यांनी तेथील परिस्थिती बघितलेली होती का? तिकडची शाळा विकायला घ्या. तुम्ही शाळा वाटेल त्याला भाड्याने देणे योग्य नाही. शाळेचे मैदान या शाळेला अडचण आहे म्हणून दुसऱ्या शाळेला दिले तर चालेल. एखादी शाळा दुरुस्त करण्याचा आहे किंवा पडलेली आहे. तर आपण आपल्या शाळेचे मैदान त्यांना देऊ शकतो.

**गजानन भोईर :-**

नगरभवनचे मैदान आहे ते भाड्याने द्या. तुम्ही शाळांचे मैदान ह्याला-त्याला भाड्याने देऊ नका.

**मिलन पाटील :-**

आपण होमगार्डसाठी वर बांधलेले आहे.

**रतन पाटील :-**

भाईंदर पश्चिमची शाळा जी महापालिकेच्या जुन्या कार्यालयासमोर आहे ती तोडलेली आहे. परंतु, आपल्याला त्योच काहीही उत्पन्न मिळत नाही. त्या शाळेचे मैदान भाड्याने द्या.

**मोहन पाटील :-**

याठिकाणी विषय असा आहे की हा विषय गांभिर्यपूर्ण आहे. या ठिकाणी स्टेट गव्हर्नमेन्टचे इन्स्ट्रक्शन नाही किंवा कोणत्या मंत्र्यांनी तुम्हाला आधीच आदेश दिलेला नाही. या ठिकाणी विषय असा आहे की तो विषय झाला पाहिजे, तो विषय व्हायला पाहिजे. या शहरामध्ये होमगार्ड असायला पाहिजे. त्याविषयी कोणाचेच दुमत नाही. परंतु, नवघर प्राथमिक शाळेवर अनेक कार्यक्रम अनेक गोष्टींनी ते अतिक्रमित झालेले आहे. त्यासाठी माझे असे म्हणणे आहे की समजा, नगरभवन आहे किंवा अनधिकृत जागा असेल तर तुम्ही त्याचे सर्वेक्षण करा की आपण या ठिकाणी याला जागा उपलब्ध करु शकतो. त्याला ह्या अडचणी किंवा फायदे आहेत हे बघा आणि त्याच्यावरुन ठरवा. जर तम्ही नवघर शाळा बघता तर तुम्ही एकाच शाळेवर किती वेळा चर्चा करणार आहात.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपल्याला ह्याच्यात एक गोष्ट लक्षात यायला पाहिजे की तुम्हाला शिक्षण महत्वाचे आहे की होमगार्ड महत्वाचे आहेत. या शहरामध्ये चांगले विद्यार्थी निर्माण करायचे आहेत की ह्या शाळेला अशांतता निर्माण करायची आहे. आपण प्रत्येक वेळेस नवघर शाळेचा विषय आणतो. मागच्या वेळेला टपऱ्याचा विषय आणलेला होता आणि आज हा विषय आणलेला आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही दोन-तीन जागेवर अतिक्रमण करता तर तुम्ही म्युनिसिपाल्टीला काही बोलू शकत नाही का?

**मा. सभापती :-**

वाहन भाड्याने घेण्याचा विषय आणलेला होता.

**मिलन पाटील :-**

मग तो विषय द्यायचा होता.

**जयंत पाटील :-**

हे होमगार्ड खाजगी आहे की सरकारी आहेत? ही संस्था खाजगी आहे की, सरकारी आहे ते प्रथम सांगा. तुम्ही खाजगी असा उल्लेख केलेला होता. तुम्ही ह्याच्यात वाचा. तुम्ही टिपणी वाचा. तुम्ही एका खाजगी संस्थेला एक शाळा डोनेट करुन टाकता का? त्या शाळेची परिस्थिती प्रत्यक्ष जाऊन कोणी बघत नाही. त्या विद्यार्थ्यांना तिकडे बसायला जागा नाही.

**गजानन भोईर :-**

त्या विद्यार्थ्यांना तिकडे बसायला जागा नाही आणि ते ग्राऊन्ड त्यांच्या ताब्यातसुध्दा आहे.

**जयंत पाटील :-**

त्या शाळेला खाजगी संस्थेला जागा देता येत नाही.

**प्रभात पाटील :-**

शाळेच्या ग्राऊन्डवर लग्न, ग्राऊन्डवर मालवणी जत्रा, अमुक जत्रा, तमुक जत्रा त्या ग्राऊन्डला काहीही अर्थ राहिलेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा०) :-**

शासनाने होमगार्ड पध्दत मान्य केलेली आहे आणि ती पध्दत मिरा भाईंदर हद्दीमध्ये चालू आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, हे सर्व कार्यक्रम खाजगी आहेत. हे तुम्ही मान्य केलेले आहे. ते सर्व कार्यक्रम खाजगी असल्यामुळे आपण त्याला कर लावलेला आहे. तुम्ही बोलले की खाजगी कार्यक्रमानां मैदान फुकट देता येत नाही. म्हणून तुम्ही कर लावलेला आहे आणि तुम्ही खाजगी असल्याचे मान्य करता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा०) :-**

या ठिकाणी खाजगी संस्था असे कुठे लिहलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

कॉम्प्युटर प्रणाली चालू करताना त्यांना एक वर्ग द्या.

**जयंत पाटील :-**

परंतु, खाजगी संस्थांना सवलतीच्या दरात जागा देता येत नसल्याने सदर निर्णयावर कार्यवाही करण्यात आलेली नाही असे लिहलेले आहे. मग हे तर खाजगी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा०) :-**

मा. महासभेने ह्याच्यापूर्वी जो निर्णय दिलेला होता त्यावेळेला एका सिनियर सिटीझनला देण्याचा निर्णय झालेला होता. परंतु, त्यांना देता आलेले नाही. आपण त्याच्यात उल्लेख केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

म्हणून तुम्ही रेट लोवलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण शाळेचे मैदान खाजगी संस्थेला द्यायचे नाही.

**गजानन भोईर :-**

आपण शाळेचे मैदान भाड्याने देणे चुकीचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण शाळेचे मैदान भाड्याने दिले तर ते फक्त रविवारी भाड्याने द्यायचे.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, गोषवारा व्यवस्थित वाचा.

**बालीजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो) :-**

शेवटी आम्ही ह्या सभागृहाचा निर्णय मान्य करु.

**जयंत पाटील :-**

साहेब, आमचा होमगार्डला विरोध नाही. फक्त ते शाळेत नको. त्यांना इतर ठिकाणी जागा शोधा.

**रतन पाटील :-**

महापालिकच्या कुठल्याही अन्य ठिकाणी असेल तर द्यायला हरकत नाही. परंतु, होमगार्डची आवश्यकता आहे.

**गजानन भोईर :-**

किती वर्ग भरतात? किती वर्ग भरत नाहीत? किती मुले कुठे बसतात? ह्याचा कोणी सर्व्हे केला आहे का? फक्त क्षेत्रफळ ४६४ लिहून दिले आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, तुम्ही नवघरच्या शाळेमध्ये नाही. परंतु, तुम्ही कुठल्याही शाळेमध्ये होमगार्ड ठेवू नका.

**मिलन पाटील :-**

तलाठी ऑफिस भाडे देत नाही. त्यांना खाली करा.

**प्रभात पाटील :-**

तिथे टाळं लावा.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांचे पैसे बरोबर कापून घेतात. मग आपण काही पैसे सोडायचे नाही. शासनाकडून साडे सहा कोटी रुपये येणार होते त्याचे काय झाले?

**प्रभात पाटील :-**

कोणत्याही शाळेमध्ये कोणताही रोड, कोणतीही जागा कोणत्याही संस्थेला देण्यात येऊ नये असा मी ठराव मांडते.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

सगळ्यांचे अनुमोदन द्या.

**गजानन भोईर :-**

त्या शाळेमध्ये कुठलीही कार्यक्रम आयेजित करायचा नाही.

**जयंत पाटील :-**

परंतु, हनुमान जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला जाईल.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यावर मा. सभापती साहेबांचे काय रुलिंग आहे?

**जयंत पाटील :-**

मी अनुमोदन देतो. मागच्या वेळेला मैदान भाड्याने दिलेले होते.

**गजानन भोईर :-**

मा. उपायुक्त साहेब, पुढचा विषय घ्या. आपण त्याचा ठराव मांडूया. कोणत्याच कार्यक्रमाला शाळेचे मैदान भाड्याने द्यायचे नाही. म्हणजे नवरात्री वगैरे कशालाही भाड्याने द्यायचे नाही. साहेब, तुम्ही तो विषय घ्या. कुठल्याही कार्यक्रमाला जागा भाड्याने द्यायची नाही.

**प्रभात पाटील :-**

मी आता ठराव मांडते.

**मोहन पाटील :-**

आम्ही त्याच निर्णयावर निर्णय घेतलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यावर हा निर्णय घ्या.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय रितसर आणूया असे माझे म्हणणे आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही आजचा दिवस टाळू नका.

**जयंत पाटील :-**

साहेब, होमगार्डच्या विषयाबाबत काय?

**एस. ए. खान :-**

अजुन नगरभवनला जागा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही होमगार्डला फ्लाय ओव्हरखाली जागा बांधुन द्या.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्या उड्डाणपुलाच्या खाली बेकायदेशीर गॅरेल चालतात ती हटवा आणि होमगार्डना तिथे बांधुन द्या.

**रतन पाटील :-**

तिथे बेकायदेशीर गॅरेज चालतात आणि त्यात मोठ्या मोठ्या गाड्या उभ्या केल्या जातात. त्या पार्कींगच्या मोठ्या गाड्या आहेत.

**मा. सभापती :-**

तिकडे पार्कींग वगैरे करावे लागले म्हणून त्या गाड्या तिथे उभ्या असतात.

**मिलन पाटील :-**

मग ते तिथे पार्कींग करतील. मग तो रोड कशासाठी आहे?

**गजानन भोईर :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर कार्यक्रम आयोजित करा.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्या शिक्षण विभागातुन आपल्याला जे साडे पाच कोटी रुपये येणार होते ते शासनाकडून येणार होते. त्याचे काय झाले?

**मा. सभापती :-**

आता हा विषय नाही.

**रतन पाटील :-**

हा शिक्षणाचा विषय आहे.

**रतन पाटील :-**

शिक्षणाचा विषय आहे. कसा काय विषय नाही असे तुम्ही बोलता. आपल्याला शिक्षण विभागाकडून पैसे येणार आहेत की नाही?

**मा. सभापती :-**

परंतु, आता तो विषय नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपल्याला शिक्षण विभागाकडून पैसे आलेले आहेत की नाहीत ते प्रथम सांगा. आता या गोष्टीवर चर्चा करुन खूप दिवस झालेले आहेत. आपल्या शासनाकडून रु. साडेपाच करोड येणार होते. ते आले कि नाही? ते सांगा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही जे सांगता त्यात रु. तीन हजारची तफावत आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही विषय बदलत आहात.

**मिलन पाटील :-**

साहेब, यात रु. तीन हजारची तफावत आहे. तुम्हाला त्याची कदर आहे का? तुम्ही ताबडतोब रु. तीन हजार त्यांच्याकडून घ्या. आपल्याला भाड्याचे उत्पन्न मिळेल. परंतु, आपल्याला जे रु. पाच कोटी रुपयाचे येणे आहे. त्याच्यावर चर्चा व्हायला नको का?

**रतन पाटील :-**

आता तो विषय नाही.

**मिलन पाटील :-**

आपण रु. पाच कोटी येण्याचा विषय नाही असे कसे बोलता? आपल्याला रु. तीन हजार उत्पन्न मिळेल.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, रु. साडेपाच कोटी येणार आहेत तुम्ही त्याचा विषय आणणार आहात का? तुम्ही तो विषय आणायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला रु. तीन हजार उत्पन्न मिळेल. मग रु. पाच कोटी येण्याबाबत आपण शासनाला अधिकाराने का विचारत नाहीत.

**रतन पाटील :-**

शासनाकडून शिक्षण विभागाचे रु. साडेपाच कोटी येणे बाकी आहे. आम्हाला त्याच्याविषयी विचारायला नको का?

**मा. सभापती :-**

परंतु, आता भाड्याचा विषय नव्हता.

**रतन पाटील :-**

याठिकाणी विषयाचा प्रश्न येतच नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

रु. साडेपाच कोटीचे येणे बाकी आहे त्याचाबद्बल काहीतरी विचारणा होणे आवश्यक आहे.

**मिलन पाटील :-**

हा शाळा विकायचा विषय कोणी आणला? मा. आयुक्तांना आपले रु. साडेपाच कोटी येणे बाकी आहे. ते समजत नाही का?

**रतन पाटील :-**

हा विषय भाड्याचा नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही या ठिकाणी शाळा विकायचा आणलेला आहे की शाळा भाडयाने द्यायचा आणलेला आहे ते सांगा.

**मा. सभापती :-**

हा विषय प्रशासनाकडून आल्यानंतर आपल्याला ही लोक आपल्याला सांगत आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, चांगल काम आहे असे आम्ही तुम्हाला सांगतो. नगरभवन आहे. ते नगरभवन होमगार्डना द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

फ्लाय ओव्हरच्या खाली जागा आहे. तुम्ही फ्लाय ओव्हरच्या खाली होमगार्डना चौकी बांधून द्या.

**जयंत पाटील :-**

होमगार्डला कोणाचाही काहीही विरोध नाही.

**रतन पाटील :-**

आपत्कालीन परिस्थितीमध्ये होमगार्डचा उपयोग होतो.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे कॅन्टीन आहे. तिथे त्याची व्यवस्था करा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही फ्लाय ओव्हरच्या खाली होमगार्डची व्यवस्था करा.

**जयंत पाटील :-**

आमचा कोणाचाही होमगार्डला विरोध नाही. परंतु, तुम्ही होमगार्डची व्यवस्था शाळेमध्ये करु नका.

**मिलन पाटील :-**

साहेब, मी काय सांगतो की जे मिरा भाईंदर महानगरपालिकेला भाडे द्यायला तयार आहेत. आणि ज्यांची ४१४ फुटाची दोन दुकान रु. १५००/- भाड्याची आहेत. ती माझ्याकडे पाठवा. मी त्यांना भाड्याने दुकान देतो.

**रतन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब भाड्याचा विषय नसला तरी चर्चा होणे आवश्यक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

सन्माननिय सदस्य मिलन पाटील यांची भाडयाबाबत मागणी होती.

**रतन पाटील :-**

आपले रु. साडेपाच कोटी शिक्षण विभागाकडून येणे बाकी आहे. मग आपल्याला चर्चा करायला नको का?

**जयंत पाटील :-**

सन्माननिय सदस्य रतन पाटील तुम्ही आमचे सर्वांचे मत लक्षात घ्या. आम्ही भाडे घेण्याला विरोध करित नाही. शाळेमध्ये विद्यार्थी शिकत आहेत. त्यांना बसायला जागा नाही. तुम्ही अजुन होमगार्ड कसे घुसवता?

**प्रभात पाटील :-**

आमचा विरोध नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

एका वर्गात दोन वर्ग बसतात.

**जयंत पाटील :-**

तुम्ही तिकडे दोन शिफ्ट का केल्या नाहित?

**गजानन भोईर :-**

सकाळची आणि दुपारची शाळा भरते.

**जयंत पाटील :-**

शाळा सकाळी आणि दुपारी भरते. तेव्हा जागेचा प्रॉब्लेम होतो.

**मिलन पाटील :-**

त्या होमगार्डची परेड घेतल्यानंतर शस्त्राचा आणि पायाचा भरपूर आवाज हाईल. मग ते विद्यार्थी शिक्षक शिकवतात तिकडे बघतील की त्या लोकांची परेड बघतील ते सांगा.

**मा. सभापती :-**

परेड वैगरे घेणार नाहीत.

**मिलन पाटील :-**

ती लोक परेड वैगरे घेतील.

**प्रभात पाटील :-**

त्यांची परेड वैगरे घेतली जाईल.

**मिलन पाटील :-**

मा.सभापतीसाहेब, नवघर शाळा तुमचीच आहे. मग तुम्ही त्या शाळेबाबत असे का करता?

**गजानन भोईर :-**

सन्माननिय सदस्य मिलन पाटील जर पाच - सहा रुम बांधून होत असतील तर बांधून द्या आणि त्या रुममध्ये सकाळ, दुपारचे वर्ग चालू करा. असे श्री. वर्तक सरांनी सांगितलेले आहेत. त्यांनी काही वर्ग दुपारी ठेवलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

त्या मुख्याध्यापकांना काय पाहिजे? ते बघा आपल्याकडे त्या मुख्याध्यापकांची कितीतरी पत्रे आहेत. आपल्याकडची ती पत्र काढून टाका.

**मिलन पाटील :-**

मा.सभापतीसाहेब, तुम्ही शहराच्या दृष्टीकोनातून तुम्ही विचार करा. आपल्याला होमगार्ड नको आहेत असे नाही. तुम्ही त्या होमगार्डना चौकी बांधून द्या आम्ही विरोध करत नाही. त्यांना नगरभवनकडे चौकी बांधुन द्या. आपली वास्तू आहे तिथे त्यांना जागा द्या. परंतु, शाळेत जागा देऊ नका. शाळा ही सार्वजनिक आहे. ती लोक ग्राऊंडवर जातील.

**मोहन पाटील :-**

हे होमगार्ड परेड वगैरे करतील म्हणून शाळा देण्यासाठी या लोकांची अडचण आहे.

**गजानन भोईर :-**

परंतु, त्याठिकाणी वर्गसुद्धा नाहीत.

**प्रभात पाटील :-**

त्या ठिकाणी वर्ग नाहीत. तुम्ही जाऊन वर्गाची पहाणी करा. त्यांचे वर्ग किती आहेत? खोल्या किती आहेत? त्याची पहाणी करा. ह्यामध्ये तुम्ही असा आढावा आणला आहे का? त्यांच्याकडे एवढे वर्ग शिल्लक आहेत. असा तुम्ही आढावा आणायला पाहीजे होता.

**गजानन भोईर :-**

तुम्ही तिकडे बघायला जाताना तुमच्या पायाला चिखल लागेल. तिथे भरणी करावी. मुलांना चालत जायला चांगला रस्ता करावा. हे कोणाला दिसत नाही का?

**मिलन पाटील :-**

माझी उत्तनला वाडी आहे. माझी ६०० फुटाची जागा आहे. मला रु. ३००/- भाडे द्या आणि सगळ्या वाडीमध्ये परेड वगैरे करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा होमगार्डचा विषय आला. मी काय म्हणतो. मिरा भाईंदरमध्ये पडीक...

**मा. सभापती :-**

आता हा विषय राहू द्या. तुम्ही शहराची सुधारणा करणार आहात की नाही ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही शहराच्या सुधारणेबाबतच बोलत आहोत. आम्ही आमच्यासाठी बोलत नाही. मा. सभापतीसाहेब, तुम्ही असे कसे बोलता?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही एकटेच सुधारणा करायला बसलेले आहेत का?

**मा. सभापती :-**

तुम्ही याचा अर्थ कळत नाही.

**प्रभात पाटील :-**

आम्हाला सगळं कळते आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला विकास करायचा नाही असे कसे तुम्ही बोलता?

**मा. सभापती :-**

परवा जेव्हा अतिप्रसंग आला. तेव्हा कोण धावत आले? कोणीही आलेले नव्हते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही रात्री १२ वाजेपर्यंत होतो.

**गजानन भोईर :-**

सगळ्यांनी आपापल्या परीने मदत केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

हे अधिकारी सरकार कडून पगार घेतात. मग त्यांना येणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदरच्या प्रशासनाने सरकारी जागा आणि आपल्या ताब्यात असलेली जागा याची व्यवस्था करुन हा विषय पुढच्या मिटींगला आणावा.

**रतन पाटील :-**

तुम्ही या होमगार्डला व्यवस्थित जागा बघा. नाहीतर नगरभवन आहे. तिथे जागा द्या.

**मिलन पाटील :-**

माझ्या प्रपोजलचा विचार करा. आपल्या शहराला माणसांची गरज आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठराव मागे घ्या.

**फॅरो ग्रिटा :-**

मागे कशाला?

**जयंत पाटील :-**

ठराव मागे कशाला पाहिजे?

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेचे मैदान कुठल्याही कार्यक्रमासाठी द्यायचे नाही असे ॲड करा.

**प्रभात पाटील :-**

मी ठराव मांडलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, ठराव मागे घेतलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

परंतु, ठराव सही करुन गेलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

त्या ठरावामध्ये साहेबांनी जे रुलींग दिलेले आहे ते ॲड करुन ठराव फायनल करा.

**प्रभात पाटील :-**

साहेबांचे रुलींग ॲड करा.

**प्रभात पाटील :-**

अभिनवमध्ये परेड घ्या.

**फॅरो ग्रिटा :-**

अभिनवमध्ये परेड घ्या.

**गजानन भोईर :-**

अभिनव विद्यामंदिरमध्ये परेड घेतली तर तिथे ग्राऊंडसुद्धा आहे.

**जयंत पाटील :-**

अभिनव विद्यामंदिरमध्ये घ्या. परेडला जागा भरपूर आहे.

**मा. सभापती :-**

शाळांना जी परेडची जागा राहीलेली होती ती सुद्धा बिल्डर लोकांनी खाल्ली असती. शिवाय नगरपालिकेने नोटीस काढल्या होत्या.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, माझे एक निवेदन आहे की, मिरा भाईंदरमध्ये धोकादायक बिल्डींगी भरपूर झालेल्या आहेत. त्या कधीही पडू शकतात. तिथले रहिवासी जागा खाली करत नाही. जर आपत्कालीन परिस्थितीमध्ये त्यात बिल्डींगचे काय झाले. तर त्यांची व्यवस्था कुठे करायची?

**रतन पाटील :-**

त्यांची व्यवस्था संक्रमण शिबिरात करा.

**प्रभात पाटील :-**

नवघरची शाळा द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, सन्माननिय सदस्य सुर्यकांत भोईर यांनी जो संक्रमण शिबिरासाठी विषय काढला. तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगमध्ये आणा. आपल्या मिरा भाईंदरमध्ये दोनशेच्या वर धोकादायक बिल्डींग असतील.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही संक्रमण शिबिराचा विषय पुढच्या मिटींगमध्ये आणा.

**रतन पाटील :-**

तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये संक्रमण शिबिराचा विषय आणा.

**गजानन भोईर :-**

काशिमीरा रोडला एक बिल्डींग पडलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण संक्रमण शिबिरासारखी राहण्याची व्यवस्था करायला पाहिजे. असा आपण पुढच्या मिटींगमध्ये विषय घेतला तर बरे होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही पुढच्या आठवडयात विषय घेउन मिटींग लावा.

**मा. सभापती :-**

आपल्यालासुद्धा त्यालोकांबद्दल आस्था आहे. बऱ्याचशा बिल्डींगी कोसळल्या तर आपले हाल होणार आहेत. तुम्हाला डिझास्टर मॅनेजमेंट नको होती. त्याच प्रमाणे मी माननिय आयुक्तांना सांगितले की कुठेतरी शासनाची जागा असेल डबलरुमची चावी बनवून ठेऊया. त्यांना चाळीमध्ये राहता येईल. आपण शंभर - दोनशे रुम बांधून तेवढ्यापुरती व्यवस्था करुया.

**मोहन पाटील :-**

तुम्ही हा विषय स्थायी समितीला घ्या. आणि चर्चा करा. जागा मिळत असेल तर ठिक आहे नाहीतर आपण हा विषय महासभेत घेउया.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही उड्डाणपुलाच्या खाली संक्रमण शिबिराला जागा घ्या. कारण लोक ते फुकट वापरतात.

**मा. सभापती :-**

जर तुम्हाला नगरपालिकेच भल करायच असेल तर त्या उड्डाणपुलाखली कुठलीही व्यवस्था ठेवता कामा नये. कोणालाही रहायला देऊ नका. त्या लोकांनी लाख रुपये भाडे दिले तरी देऊ नका. ऊद्या त्या पुलाखाली कोणी बॉम्ब ठेवला तर पुल ऊडुन जाईल.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही डिझास्टर मॅनेजमेंट नको आहे असे बोलता. मी तुमच्यावर आरोप करत नाही आणि आमचा तुमच्या होमगार्डला विरोध नाही. आम्हाला नवघर शाळेमध्ये किंवा कुठल्याही शाळेमध्ये होमगार्डची व्यवस्था करु नये एवढेच आम्हाला बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

आता तो विषय घेतलेला आहे.

**गजानन भोईर :-**

उद्यापासून नगरभवनला होमगार्डला जागा द्यायला सुरवात करा.

**प्रभात पाटील :-**

आमचा होमगार्डला होकार आहे.

**मा. सभापती :-**

आपण होमगार्डची व्यवस्था शहरासाठी करणार आहोत. त्याच्यामध्ये बाहेरचे लोक नाहीत.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही नगरभवनला म्हणजेच जे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान आहे. त्या मैदानात होमगार्डना जागा द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

असं करण्यापेक्षा महापालिकेचे ऑफिसच द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही आता म्हणालात त्या पुलाखाली ट्रक वगैरे ठेऊ नका. परंतु, आम्ही त्यादिवशी बॉम्ब स्फोटच्या दिवशी गेलो होतो. तेव्हा गाडी पार्कींग करायला जागा नव्हती. त्या ब्रीजच्याखाली सर्व ट्रकच्या ट्रक उभे होते. आता आपण ठेका वगैरे काढला आहे का? बाहेरुन गाड्या माल घेऊन येतात त्या सर्व गाड्या तिथे असतात. तुम्ही तिकडे पार्कींगला ॲलाऊड केलेले आहे का?

**एस. ए. खान :-**

तिथे पे ॲन्ड पार्कींग आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ब्रीजच्याखाली पे ॲन्ड पार्कींग आहे का?

**प्रभात पाटील :-**

ब्रीजखाली पे ॲन्ड पार्कींगचा बोर्ड लावलेला असला तरी तिथे भाडे घेतात का?

**एस. ए. खान :-**

तिथे गाड्यांचे भाडे घेतले जाते.

**प्रभात पाटील :-**

तो ठेका कोणाला दिलेला आहे?

**ज्युडी डिसोझा :-**

तो ठेका कोणाला दिलेला आहे ते सांगा?

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणाला ठेका दिलेला आहे वगैरे सर्व काही समजले. उद्या त्या पे ॲन्ड पार्कींगमध्ये बॉम्बस्फोट झाला तर आपल्याला कसे काय समजणार? आपल्याला पे ॲन्ड पार्कींगच्या बोर्डच्या ठिकाणी रु. २०/- ते रु. २५/- भाडे मिळेल.

**प्रभात पाटील :-**

यासाठी मला असे वाटते की जर नवघर ग्राऊन्डमध्ये झुणका भाकर केंद्र केलं असतं तर ते प्रथम उडवलं असतं. सरकारी मासा कोणीही खावा असे म्हणतात. तर तो मासा नगरसेवक, पदाधिकारी किंवा अधिकाऱ्यांनी खायचा नाही. तो तिसऱ्या कोणीतरी खाल्ला तर चालेल.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही एका जबाबदार खुर्चीवर बसलेले आहात. तुम्ही सरकारी मासा कोणीही खावा अशा गोष्टी बोलणे योग्य नाही. तुम्ही एक जबाबादार व्यक्ती आहात. आम्ही काय बोलतो ते तुम्ही व्यवस्थित ऐका. आपल्याकडे व्यवस्था पाहिजे असे ते बोलले ते बोलले ते बरोबर आहे. कारण आपल्याकडे कधीही हादसा होऊ शकतो. आज आपल्याकडे एवढ्या धोकादायक इमारती आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे की तुम्ही हे संक्रमण शिबीर बांधुन ठेवा. आपल्याकडे हादसा वगैरे झाला तर आपण नंतर बघुया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मी तुम्हाला या ठिकाणी माहिती देतो की आपल्याकडे समायोजनातुन जवळपास जे ९३-९३ फ्लॅट मिळणार आहेत ते याच्यासाठी रिझर्व ठेवणार आहोत.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला फ्लॅट मिळणार आहेत. परंतु, बिल्डर तुम्हाला सहजासहजी तुमच्या हातामध्ये चावी देणार नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आपण त्यांना अहवाल दाखवायला दिलेला आहे.

**प्रकरण क्र. ४६ :-**

नवघर शाळा इमारतीमधील वर्ग होमगार्ड पथकास ताप्तुरत्या स्वरुपात भाड्याने देणे बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कोणत्याही शाळा इमारती मधील वर्ग शैक्षणिक कामकाजा व्यतिरिक्त खाजगी संस्था, सरकारी संस्था, व्यक्ती व इतर कोणत्याही संस्थेस भाड्याने किंवा विनामुल्य देण्यात येऊ नये.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४७ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

आता श्री. पानपट्टे साहेब आलेले आहेत. त्यांना 'पे ॲन्ड पार्क' बाबत सांगावे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मिरा रोडच्या साईडचे 'पे ॲन्ड पार्क' चे काम ठेकेदाराला दिलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. पानपट्टे साहेब, काशिमिरा रोडच्या पे ॲन्ड पार्कचे काय झाले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण तात्पुरते दिलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, त्या दिवशी बॉम्बस्फोट झाला तेव्हा आपल्या पालिकेच्या गाड्यांना पार्कींगची जागा नव्हती. एवढं एवढं गच्च ट्रक भरलेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

जकात नाक्यामध्ये आतमध्ये गाड्या जाताना रोडवर गाड्या पार्कींग करतात. तिथे रोडवर ट्रॅफीक जाम होते. तुम्हाला ते दिसत नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही पे ॲन्ड पार्कींगची पाहणी केलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही कुठल्या साईडला गेलेले होते ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही काशिमिरा साईडला गेलेलो होतो.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही काशिमिरा साईडला गेलेले होते मग त्या सनराईज हॉटेलच्या समोर गाड्या उभ्या राहतात. तुम्ही त्या का उचलत नाहीत? याचे मला उत्तर द्या. तिथे भरपुर ट्रॅफीक असते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जो रस्ता केलेला आहे तो वेगळा आहे आणि तेथील पार्कींगवाल्यांकडून पैसे घेतले जातात.

**सुर्यकांत भोईर :-**

सनराईज हॉटेल समोर ज्या गाड्या उभ्या केल्या जातात मी त्याबाबत बोलत आहे. तुम्ही ठेका कुठे दिलेला आहे ते मला सांगा. तुम्ही काशिमिऱ्याचा विषय काढलेला आहे. मग काशिमिऱ्याला कुठे ठेका दिलेला आहे ते मला सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जेथे टेम्पो उभे राहतात तिथुन फाटकापर्यंत बाबत मी बोलत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मग तुम्ही काशिमिरा नाक्याचे कसे काय बोलता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी काशिमिरा रोडबाबात बोलत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तो छत्रपती शिवाजी महाराज रोड आहे तो काशिमिरा रोड नाही.

**मिलन पाटील :-**

यांचा जो जी. आय. एस. चा उपक्रम आहे तो उपक्रम साधे दै. मुंबई लक्षद्विप व दै. मंबई संध्यामध्ये देणार आहेत. आपण या दोन दैनिकांमध्ये एवढी मोठी निविदा देणार आहोत. आपण ही निविदा दि. ११ एप्रिलला काढलेली आहे. मग या निविदेला एवढे दिवस का लागले? आपण या निविदेला दि. ११ एप्रिलमध्ये मंजुरी दिलेली आहे. आज चौथ्या महिन्याचा सातवा महिना झालेला आहे. सातवा महिना चालू आहे त्यातील आता तीन-चार महिने जवळ जवळ हे होत आहे. पुन्हा आपण या दैनिकांमध्ये ऐवढे मोठे काम करणार आहोत. ही जी संस्था सॅटेलाईटचे काम करते त्या संस्थेचे काम करण्याबाबत मला असे विचारायचे आहे की ही लोक मराठी पेपर वाचतात का? टाईम्स ऑफ इंडियाचे जो स्टॅन्डर्ड किंवा जे चांगले पेपर आहेत त्यांना ॲड द्या. तुम्ही टाईम्स ऑफ इंडियामध्ये ॲड द्या. तुम्ही नवशक्ती, महराष्ट्र टाईम्स, लोकसत्तामध्ये ॲड द्या. आज आपण म्युनिसिपाल्टीतुन दिड-दोन करोडचा खर्च करतो. तर या दोन निविदामध्ये किती तफावत आहे ते बघा. म्हणजे आम्ही नक्की काय समजायचे ते सांगा.

**गजानन भोईर :-**

या ठिकाणी १० लाखाची तफावत आहे.

**मिलन पाटील :-**

आम्ही नक्की कुठली संस्था समजावी. खरे म्हणजे आम्हाला हाच प्रश्न पडलेला आहे. ही जी संस्था आहे ती रु. १ करोड ६४ लाख १८ हजारची निविदा भरते आणि ही जी आहे ती ५४ हजाराची याचा अर्थ यांचे इन्स्टुमेन्ट खरे आहेत आणि यांचे इन्स्टुमेन्ट चांगली आहेत.

**गजानन भोईर :-**

तुम्ही यांना अटीशर्तीची दुसरी सवलत दिलेली होती का?

**मिलन पाटील :-**

आपण जे फॉर्म वाटले त्याचा ह्याच्यामध्ये समावेश आहे का? कारण एवढा फरक जास्त आहे आम्ही याच्यामध्ये नक्की काय समजायचे? आम्ही याचा ठराव करतो. जर तुम्हाला याची फेरनिविदा मागवायची असेल तर मागवा. नाहीतर खरे पाहता आपल्याला याची आवश्यकता नाही. तुम्ही इर्मजन्सीला आवश्यकता आहे का ते बघा. आज आपण जे खड्डे खेदणार आहोत त्याबाबत रिलायन्सवाला तुमचा प्लॅन बघायला येणार आहे का? माझी केबल कुठपर्यंत चाललेली आहे ते तो बघणार आहे का? आपल्याला काय होत नाही. आपले पैसे पाण्यामध्ये जाणार आहेत. इथे ह्याची आवश्यकता पुढे भासेल. जेव्हा आपण कंट्रालमध्ये काम करु. बॉम्बे म्युनिसिपाल्टी जसे काम करते आपण त्या पध्दतीने आलो किंवा त्या स्टेजला आलो तर ही गोष्ट ठिक आहे. आज आपण काम घ्यायच बोलतो किंवा जर समजा तुमच्याकडे चेअरमन साहेबांची रात्रीच्या वेळेला लाईट गेली तर ते म्युनिसिपाल्टीला जागे करुन तुमचे प्लॅन बघायला येणार आहे का? ते खोदणार आहे. ते तेथे वायर असो वा टेलीफोनची वायर असो, पाण्याची लाईन असो ते कायपण असो ते खोदणार म्हणजे खोदणार. आपल्याला ह्या गोष्टीचा काहीही उपयोग नाही. आज आपण रुपये दिड करोड खर्च करणार आहोत. ह्याच्यामध्ये तफावत किती आहे? आपण ह्यांचे इन्स्टुमेन्ट सत्य समजायचे की जे रुपये दिड करोड भरले जे सत्य समजावे. श्री. नाकाडी साहेब कुठे आहेत? ते नेहमी चार निविदा पास करत नाहीत. मग त्यांनी आता दोन निविदा कशा पास केल्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्माननिय सदस्य, मिलन पाटील साहेब मी खुलासा करतो.

**मिलन पाटील :-**

मी बोलल्यानंतर तुम्ही बोलायचे आहे. कारण मी अध्यक्षाच्या परवानगीने बोलत आहे. आपण दोन निविदा कधी घेतो का? माझा असा विचार आहे की आपल्याला ह्याची आवश्यकता नाही. आपण पुढे बघू बॉम्बे आपण जेव्हा बॉम्बे म्युनसिपाल्टीच्या लेव्हलला येऊ थोड्या वर्षानंतर कारण आपले बाळ नुकतेच जन्माला आलेले आहे. आपले बाळ दोन-चार-पाच वर्षाचे झालेले आहे. आज म्युनसिपाल्टीवर एवढे कर्ज आहे. त्यामुळे आपल्याला याची आवश्यकता नाही. आपण आपल्याकडून त्या स्टेजला आपले कर्मचारी हायलेव्हलचे झाले पाहीजे असा विचार केला पाहीजे. आपण आता इंजिनियरच्या नेमणुका केलेल्या आहेत. त्यापेक्षा आपल्या कडील अधिकाऱ्यांना चांगली माहिती आहे. आज तुम्ही श्री. बारकुंड साहेबांना ही पाईप लाईन कुठे जाते? ते सांगतील की ही पाईप लाईन इथून गेलेली आहे. आपल्या बांधकाम किंवा पाण्याच्या पाईपलाईनबाबत ह्या लोकांनी समन्वय साधला तर ही गोष्ट साध्य होऊ शकते. ही केबल इथूनच टाकली पाहिजे असे केले तर घ्या दोन्ही डिपार्टमेंटला रू. दिड करोड खर्च करण्याची जरुरत नाही. त्यांनी समन्वय साधून ही पाईप इकडे गेलेली आहे. हे गटार इथून गेले पाहीजे, केबल इकडून गेलेली आहे, ती पाईपलाईन तिकडून गेलेली आहे. तुम्ही टेलिफोन वगैरेची केबल एकत्र टाकून द्याना. माझे असे म्हणणे आहे की आपल्याला या गोष्टीची काहीही आवश्यकता नाही. पुढच्या स्टेजला आपण विचार करु. आम्ही आता हा विषय फेटाळून लावतो. आपल्याला पुढच्या वेळेला निविदा काढायची जरुरत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

निविदा काढायची गरज नाही असे म्हणणे प्रॅक्टीकल आहे.....

**मिलन पाटील :-**

परंतु, पुन्हा निविदा काढण्याची आवश्यकताच नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

दै. मुंबई संध्या हा पेपर कोण वाचतो? मी ह्या पेपरचे नावही ऐकलेले नाही.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आजच्या दै. मुंबई संध्यामध्ये दै. मुंबई लक्षद्वीपमध्ये काय बातमी आहे? ते मला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या मुद्याचा विचार करता कॉम्पीटीशन आणि आलेले दर ह्याच्याबद्दल आपले दुमत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जे काही कॉलिफाय आयटम आहेत. तुम्ही त्याच्यासाठी चांगल्या पेपरमध्ये ॲड द्या. तुम्ही ज्या पेपरमध्ये ॲड देता ते पेपर कोणीही वाचत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

परंतु, आपल्याला भविष्यात जी आय.एस. प्रणाली आपश्यक आहे.

**मिलन पाटील :-**

आता आपले बाळ चार वर्षाचे झालेले आहे. ते सत्य आहे. आपल्याला ज्यावेळेला ज्या गोष्टींची आवश्यकता भासेल तेव्हा आपण ती गोष्ट घेऊया. रिलायन्सवाले तुमचा प्लॅन बघितल्याशिवाय खोदकाम करणार नाहीत याची तुम्ही जबाबदारी घ्याल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही एखादी खोदण्याची गोष्ट करता किंवा एखाद्या गोष्टीची चर्चा करता येत नाही. जी आय.एस.चे महत्व एवढे मोठे आहे की प्रत्येक शहरातील जी मालमत्ता आहे. त्याचा डिटेल सर्व्हे होणार आहे. आणि तो सर्हे आणि त्याचा वापर म्हणजे शहरातील प्रॉपर्टी, ओपन प्रॉपर्टी, रस्ते याचे डिमार्केशन आणि त्याचा रेकॉर्ड अद्ययावत होणार आहे. आपल्याला तो भविष्यात प्रत्येक कामाला उपयोगी पडणार आहे. आता ह्याच्यामध्ये अंडरग्राऊन्ड सर्व्हे आहे. म्हणजे पाईपलाईन्स आहेत व आपण भविष्यात ड्रेनेजची योजना करणार आहोत. याच्यामध्ये जी.आय.एस. प्रणाली कम्लसरी आहे. आपण त्याचा वापर कितपत करु हा आपला विषय आहे. आपण प्राधान्य देऊन याचा वापर करायला पाहीजे.

**सुर्यकांत भोईर :-**

सर्व्हे करण्यासाठी ड्रेनेजची नेमणुक झालेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मग ते ड्रेनेज करुन मोकळे होतील. ह्याच्यामध्ये कसे असते की जर आपण एका पॉईन्टवर गेलो तर इथे कोणत्या व्यासाची पाईपलाईन आहे. हा रस्ता किती रुंदीचा आहे. ह्या ठिकाणी ड्रेनेजचे किती कनेक्शन आहेत? या सर्व गोष्टी ह्याच्यामध्ये येणार आहेत. जी.आय.एस. सर्व्हे सुपर स्पेशल एक स्पेसमध्ये न होता हा मल्टिस्पेस सर्व्हे असतो. आणि हे आवश्यक आहे. फक्त याच्यातील कॉम्पीटिशन आणि आलेले दर मान्य नसतील तर आपण त्याला निर्णय घेऊ शकतो. परंतु, नको म्हणणे बरोबर नाही.

**मिलन पाटील :-**

आम्ही जी.आय.एस. प्रणाली नको म्हणत नाही. आम्ही असे म्हणतो की आपले बाळ चार वर्षाचे झालेले आहे. आपण आपले जे इंजिनियर आहेत. ज्यांना आपण प्रमोशन दिलेले आहे. त्या लोकांना सध्या काम करु द्या. त्याच्या बुध्दीची चाचणी घ्यायला पाहिजे. त्यांनी ज्या पाईप लाईन्स टाकल्या आहेत तेच आपले लोक आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तुम्ही एकच विषय का घेवुन बसलेले आहात. आपल्या अधिका-यांनी जो काही सर्व्हे केलेला आहे. त्याच्यामध्ये शंभर बिल्डिंगना टॅक्स लावलेला आहे. अजून ९५ बिल्डिंगना टॅक्स लावायचा राहिलेला आहे. तो टॅक्स ह्याच्या माध्यमातून वसूल केला जाईल. मी हे अधिका-यांनासुद्धा सांगतो. शिवाय बिल्डिंगला टॅक्स लावल्याशिवाय कसलेही कनेक्शन द्यायचे नाही. तुम्ही हा विषय फेटाळा. कारण मला हा विषय फेटाळला तरी काहीही हरकत नाही.

**जयंत पाटील :-**

श्री. पानपट्टेसाहेब, तुम्ही आम्हाला जी.आय.एस. चा फुलफॉर्म सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

जी.आय.एस. चा फुलफॉर्म जीओग्राफी इन्फॉर्मेश सिस्टिम असा आहे.

**जयंत पाटील :-**

आम्ही मा. सभापतींना जी.आय.एस. चा फुलफॉर्म विचारत आहोत.

**मा. सभापती :-**

जी.आय.एस. बाबत विचारले म्हणून मी सांगतो की ती लोक संपुर्ण शहराचा सर्व्हे करून आपल्याला रिपोर्ट करणार आहेत आणि सॅटेलाईट तिथे घेणार आहेत.

**मिलन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही हे जे रु. ५० लाख दिलेले आहेत आणि जे रू. १ कोटी ६४ लाख आहेत. तुम्ही ह्याच्यामधून कुठली निविदा मागणार आहात. प्रथम तुम्ही आम्हाला याचे उत्तर द्या. ही जी प्रणाली किंवा संस्था आहे. तुम्ही त्यापैकी कुठली संस्था खरी मानाल. त्याचे प्रथम नक्की करा. आपण रू. १०/- ते रू. ५०/- च्या फरकाचा कधीही विचार केला नसता. कदाचित, हे कॉम्पीटिशनमध्ये होऊ शकते. परंतु, त्यांच्या मशिनरीमध्ये एवढा फरक असणे बरोबर नाही.

**जयंत पाटील :-**

त्या इन्स्ट्रुमेन्टची क्वालिटी बरोबर नाही का? की ती लोक आपल्याला सेकन्ड हॅन्ड इन्स्टुमेन्ट पुरवणार आहेत असे आहे का? एन.एम.आय. आणि रोल्टा दोन्हीचे इन्स्ट्रुमेन्ट चांगले आहेत. मग दोन्हीमध्ये एवढा फरक का? जर तुम्ही टी.व्ही. घ्यायला गेलात तर तुम्ही एल.जी चा टिव्ही घ्या नाहीतर सॅमसन्गाचा टिव्ही घ्या. त्याच्यामध्ये फक्त रू. २००/- ते रु. ४००/- चा फरक असू शकेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, ते इन्स्टुमेन्ट नसून सॉफ्टवेअर आहे.

**मिलन पाटील :-**

आपण अजुनपर्यंत ह्या स्तराला गेलेलो नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हा विषय महासभेने ऑलरेडी मंजुर केलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मी या ठिकाणी मा. आुयक्त साहेबांच्या पत्राचे वाचन करतो. सार्वजनिक बांधकाम विभाग, विषय :- सन २००६-०७ या वार्षिक वर्षात नविन कामे प्रस्तावित करणेबाबत. संदर्भ :- मा. आयुक्त साहेब यांच्याकडे जावक क्र. मनपा/आयुक्त २००५-०६-०७, ०५/०७/२००६ चा आदेश अपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, सन २००५-०६ या वर्षात मोठ्या प्रमाणावर विकासकामे हाती घेतल्याने सदर विकास कामावर खर्च सन २००६-०७ या वार्षिक वर्षात होणार असल्याने अर्थसंकल्पाच्या अंदाजपत्रकात तरतुद शिल्लक नाही. तरी आपल्या प्रभागात तातडीने करावयाची अत्यावश्यक कामे आपल्या आपल्या नगरसेवक सेवा निधी व प्रभाग समिती निधीमधुन प्रस्तावित करण्यात यावी याव्यतिरीक्त इतर कामे प्रस्तावित करण्यात येऊ नये ही नम्र विनंती.

**गजानन भोईर :-**

हे कोणाचे पत्र आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

हे मा. आयुक्त साहेबांचे पत्र आहे. श्री. खांबित कार्यकारी अभियंता असे लिहलेले आहे. तुम्ही महापालिकेवर बोजा कशाला आणता?

**मिलन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, या पत्राकडे लक्ष दिलेले होते की नाही ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्हाला आम्हाला नाही असे सांगता मग तुम्ही फन्ड कुठून आणणार?

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब फन्ड नाही असे बोलतात.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही ठराव पास करतात. मग फन्ड कुठून आणणार? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण मागच्या बजेटमध्ये जो वर्षाचा रु. ७५ लाख असा प्रवेश कर आकारलेला आहे. तुमचा प्रवेश कर सुरु झालेला आहे का? मग तुम्ही रु. ७५ लाख कुठून आणणार आहात? म्हणजे ह्या संपूर्ण बजेटची वाट लागली.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही बजेटमध्ये ठरविल्याप्रमाणे कार्यवाही करित नाहीत. बजेट वाढविण्याचा प्रयत्न करित नाहीत. तुम्ही प्रथम ॲडजेस्टमेन्टचे विषय आणता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्ही ॲडजेस्टमेन्टचा वगैरे विषय बोलू नका. महासभेने हा विषय मंजुर केलेला आहे. मा. आयुक्त साहेबांनी या विषयाचा गोषवारा दिलेला आहे. मी त्याच्याबद्दल माहिती सांगतो.

**मिलन पाटील :-**

जर तुम्हाला हा विषय पास करायचा होता तर तुम्ही तो विषय अवलोकनार्थ आणायला पाहिजे होता. या विषयाचा गोषवारा दिला. याचा काय अर्थ आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आता पन्नास माणसे जी आय.एस. घेणार आहेत. आपल्याला प्रत्येक प्रॉपर्टीचा फिजीकल सर्व्हे करायचा आहे. प्रत्येक प्रॉपर्टीचा फिजीकल सर्व्हे केल्यानंतर कोणाला टॅक्स लागला नसेल, कोणाचा कार्पेट कमी-जास्त असेल किंवा टॅक्सच्या वापरात बदल केला असेल. अशा सर्वांचा दोन महिन्यात सर्व्हे केल्यानंतर उत्पन्नामध्ये रुपये एक दोन कोटीची वाढ होईल अशी मा. आयुक्त साहेबांची भावना होती. म्हणून सदरचा विषय महासभेने तीन-चार मिटींगपूर्वी मंजुर केलेला होता. शासनाच्या गाईडलाईन्स नुसार दि. २०/०८/२००३ च्या जी.आर. नुसार आपण सात जी.आय.एस. कंपनीकडून घेणार आहोत. त्यांनी सात जी.आय.एस.चे डॉक्युमेन्ट दिलेले आहे. आम्ही तरीसुध्दा पेपरमध्ये पब्लिसिटी म्हणून जाहिरात दिलेली होती. सात जी.आय.एस. साठी दोन कंपन्यांनी अर्ज केलेले होते.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, यांचे स्टॅन्डर्ड काय आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते जाऊ दे. शासनाने काय दिलेले आहे? ते बघा. आपण या ठिकाणी सातही कंपन्यांना बोलावलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही ज्या कंपन्यांना हे देतात. ते मराठी पेपर वाचतात का?

**मिलन पाटील :-**

तुम्ही ही कंपनीला द्यायला काहीही फॉर्म नाही. तुम्हाला याच्या गाईडलाईन्स मिळणार नाहीत. असे शासनाने सांगितलेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण सात कंपन्यांना नॉमीनेट केलेले आहे. त्या सातही कंपन्यांचे ई-मेल आयडी घ्यावे लागतील.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला ज्याकाही सुचना केलेल्या आहेत. त्याबाबत सभागृहाचे मत घ्यायचे. आता सभागृहाला जे योग्य वाटेल तेच ठरवायचे आहे. आताच्या स्टेजला सभागृहाला जी आय.एस. ची आवश्यकता वाटत नाही. आम्ही हा विषय फेटाळून लावतो. तुम्ही आता नागपुर आणि मुंबई महानगरपालिकेची आपल्या महानगरपालिकेबरोबर बरोबरी करता त्यासाठी आपला विषय त्यांच्या बरोबरीला येऊ दे. आम्ही या विषयाचा नंतर विचार करु. आता जे अभियंते आहेत आम्हाला त्यांना चान्स द्यायचा आहे. त्यांना आभ्यास करु दे आणि आपल्याला जी आ.एस. ची आवश्यकता आहे का? याचा त्यांना विचार करु दे. मग आम्ही विचार करु.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, मी तुमच्या एक गोष्ट निदर्शनास आणून देतो की, महानगरपालिकेत जी.आय.एस. प्रणाली लागु करावी की नाही याबाबत महासभेने दि. २०/०१/२००६ रोजी धोरणात्मक सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतलेला आहे. जी.आय.एस. लागु करण्याबाबत चर्चा न करता आलेले दरपत्रक मान्य करायचे, निविदा पुन्हा कॉल करायची का? याबाबत सभेचा निर्णय होणे अपेक्षित आहे. महासभेने जी.आय.एस. ला मान्यता दिल्यानंतर उलट चर्चा करणे म्हणजे महासभेला नाकारल्यासारखे होईल. माझी अशी विनंती आहे की इतर सन्मा. सदस्यांनी स्पर्धा पूर्ण झालेली नाही असे सांगितलेले आहे. त्याबद्दल या ठिकाणी चर्चा व्हायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

जी.आय.एस. प्रणाली लागु करणाऱ्या अजुन बऱ्याच संस्था आहेत. त्यामुळे तुम्ही याची जाहिरात इंग्लीश वर्तमानपत्रामध्ये द्या. आम्ही तुमच्याच मताबाबत बोलत आहोत. तुम्ही सात संस्था बोलता. आम्ही त्याबाबतच खुलासा करित आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याचा शासनाचा जी.आर. आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही सात कंपन्याबाबत बोलता. त्याप्रमाणे मी सगळ्यांना समजु दे असे बोलतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही त्यांना कळविलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्यांना अन-ऑफिशियली कळविलेले असेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आमच्याकडे लेटर आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही वर्तमानपत्रामध्ये बातमी दिली असेल आणि ती लोक आली तर तुम्ही कळविले असा अर्थ झाला.

**मिलन पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, तुम्ही सभागृहाचे म्हणणे ऐकूण घेणार की तुम्ही तुमचे म्हणणे खरे करणार ते सांगा. आम्हाला जी.आय.एस. बाबत फेरनिविदा मागवायची आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मग तुम्ही फेरनिविदाबाबत निर्णय घ्या.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आमच्याशी फेरनिविदाबाबत बोला.

**जयंत पाटील :-**

तुम्ही टाईम्स ऑफ इंडिया या पेपरमध्ये जाहिरात द्या.

**मिलन पाटील :-**

टाईम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता, नवशक्ती किंवा महाराष्ट्र टाईम्समध्ये जाहिरात द्या आणि फेरनिविदा मागवा.

**मा. सभापती :-**

जी.आय.एस. बाबतचा विषय सभागृहासमोर आल्यानंतर सर्वांचे असे एकमत आहे की या निविदा फेर काढाव्यात.

**प्रेमनाथ पाटील :-**

राष्ट्रीय पेपरला जाहिरात द्या.

**गजानन भोईर :-**

नॅशनल पेपरला जाहिरात द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी या ठिकाणी असा खुलासा करतो की, एस्कॉर्टसाठी असा विषय आलेला आहे. परंतु, तुम्ही उपकर असे अनावधानाने बोलला असाल. एस्कॉर्ट म्हणजे निर्गमित दाखल्यासाठी जी फी आहे. बहुतेक तुमची त्याबाबत अपेक्षा आहे. त्या अनुषंगाने महासभेने मान्यता दिल्यानंतर त्याची जी वैधानिक कार्यवाही आहे आम्ही ती कार्यवाही पूर्ण टप्प्यात पूर्ण केलेली आहे. आपण त्याचा अहवाल शासनालासुध्दा सादर केलेला आहे. आम्ही आवश्यक ते निर्गमित आणि इन्कमिंग नाके आयडेन्टीफाय करण्यासाठी बांधकाम विभाग आणि नॅशनल हायवेच्या अधिकाऱ्यांबरोबर पाहणीसुध्दा केलेली आहे. त्यासाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर लागते किंवा साईडला तात्पुरते दोन-तीन वाहने उभी करण्यासाठी जागा अपेक्षित आहे. आम्ही त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला विनंती केलेली आहे. त्यांनी त्यांची मान्यता घेतलेली आहे आणि ते काम प्रगतीपथावर आहे. आम्ही ह्या-ह्या नाक्याचे स्थळ करुन दिलेले आहेत असा त्यांच्याकडून करुन दिलेले आहेत. ते पूर्ण झालेले नाही. आम्ही त्यानंतर लगेच कार्यवाही सुरु करणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे काम किती वेळात पूर्ण होईल? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला सर्व्हिस रस्त्यामध्ये जे रोड बायडिंग करावे लागणार आहे त्याच्या निविदा मागितलेल्या आहेत. आम्ही त्याची पाहणी करताना तुम्ही आमच्याबरोबर होतात. ज्यावेळेला मान्यता मिळाली आम्ही त्या पंधरा, दिवसाच्या आतमध्ये कार्यवाही पूर्ण केलेली आहे. त्याच्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्टला ज्या इतर बाबी त्या बांधकाम विभागाकडून पूर्ण होऊन आम्हाला मिळाल्या बरोबर आम्ही तात्काळ कार्यवाहीला सुरुवात करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण बजेटनंतर १ एप्रिलला चालू करणार होतो. आता चार महिने झालेले आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हाला शहराची भौगोलिक रचना माहिती आहे. विशेषतः आपल्या शहरात इन्कमिंग आणि आऊटगोईंगचे जे मुख्य रस्ते आहेत. ते नॅशनल हायवेचे रस्ते आहेत. आपल्याला नॅशनल हायवेच्या प्रॉफिटची इन्टन्सिटी माहिती आहे. नॅशनल हायवेच्या बाजुचे सर्व्हिस रस्ते पूर्णपणे विकसित झालेले नाही. नॅशनल हायवेवाले त्यांच्या जागेवर टॅक्स लावण्यासाठी विरोध दर्शवित होते. त्यांना अधिनियमाच्या तरतुदी दाखविल्यानंतर त्यांनी ते मान्य केलेले आहे. ह्या आपल्या पर्सनल अडचणी आहेत. आपल्याला सर्व फ्री आहे आणि आम्ही ते करीत नाही अशी कुठलीही बाब नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण बजेटमध्ये जी तरतुद करतो ती कुठेही खोळंबता कामा नये. आपल्याला आपल्या बजेटमध्ये काहीही अडचण येता कामा नये.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही बजेट वाढविण्याच्या हिशोबाने विषय घेऊन त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करण्याचा विचार करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

बजेट वाढवून चार महिने झालेले आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण या विषयाचे तात्काळ एग्झिक्युशन करुया.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण टोलनाका बसविणार होते. त्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते ह्याच्यामध्ये आहे. आम्ही पेणकरपाड्याच्या साईडला इन्कमिंगला व वर्सोवाच्या खाली जागा फायनल केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

कारखानदारांना व दुकानदारांना रिन्युव्हलची फी आकारण्याबाबत मी एक पत्र दिलेले होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही एन.ओ.सी. बाबत बोलता का?

**प्रेमनाथ पाटील :-**

मी एन.ओ.सी. बाबत बोलत नाही. मी रिन्युव्हल फीबाबत बोलत आहे. आपल्याकडे अजुनपर्यंत त्याचे उत्तर आलेले नाही. जर असे केले तर आपले रु. १५ करोड ते रु. २० करोड उत्पन्न वाढवायला पाहिजे होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहरामध्ये ज्या बिल्डींगना टॅक्स लागलेला नाही. अशी प्रत्येक प्रॉपर्टी असेसेबल होण्यासाठी आम्ही त्याचे चार झोन केलेले आहेत आणि त्याच्या अधिपत्याखाली नियुक्ती केलेली आहे. आम्ही त्याचे कामसुध्दा सुरु केलेले आहे. आपल्या वॉर्डमध्ये जे नागरिक असतील आपण त्यांना अवगत करायला हरकत नाही. श्री. अजित पाटील ते काम करतात. आम्ही श्री. अजित पाटील यांच्या अधिपत्याखाली २५ लोकांची नियुक्ती केलेली आहे. आपल्याला या महिन्यात रु. ५ कोटी ते रु. ७ कोटी वाढीव जमा होतील. अशी आपली अपेक्षा आहे. हे सर्व मार्ग दाखवल्याबाबत आहे आणि आम्ही इतर लायसन्सचा विषय महासभेकडे पाठवणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

कारण आपल्याला ते उत्पन्न मिळवण्यासारखे आहे.

**मिलन पाटील :-**

दुसरा विषय म्हणजे आपल्याला शिक्षण खात्याकडून जवळ - जवळ रु. साडे पाच कोटी येणे आहे. त्याच्यामध्ये बांधकाम विभागाने कुठपर्यंत प्रगती केलेली आहे? ते सांगा. तुम्ही इनकमची बाब बघत नाही. ५ कोटी आपलं जे काही येणं बाकी आहे. तुम्ही त्या गोष्टीचा काहीही विचार करित नाहीत. त्या गोष्टीला काय अर्थ आहे कि नाही? तुम्ही त्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. तुम्ही याबाबत सिटी इंजिनियरसाहेबांना विचारा.

**शरदचंद्र वैरागडे :-**

तो विषय शिक्षण खात्याकडे आहे. ती लोक तेव्हा सांगतात तेव्हा डेप्युटेशन इंजिनियर त्यांच्याकडे आहे. पण ते प्रकरण जे आहे डायरेक्टर ऑफ एज्युकेशनल यांच्याकडे शेवटपर्यंत सुर्पुद आहे.

**मिलन पाटील :-**

म्हणजे नाशिकला आहे की मुंबईला आहे ते सांगा.

**शरदचंद्र वैरागडे :-**

मुंबईला आहे.

**मिलन पाटील :-**

चर्नी रोडला ऑफिस आहे. तिथे असेल. आपल्याला मुंबईवरुन ताबडतोब मिळेल ना.

**दिपक खांबित :-**

त्याचे ऑफिस पुण्याला आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

मुंबईला आहे.

**मिलन पाटील :-**

आपल्याला शिक्षण विभागाकडून भाडयाचे पैसे यायचे आहेत. त्याचे काय झाले?

**दिपक खांबित :-**

परंतू, ते काम शिक्षण विभागाचे आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

ते काम शिक्षण विभागाचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

ते काम शिक्षण विभागाचे असले तरी आपल्या महापालिकेने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

**प्रकरण क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपलिकेची GIS (Geographical Information System) प्रणाली विकसीत करणे कामी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर महानगरपलिकेची GIS (Geographical Information System) प्रणाली विकसीत करणे कामी फेरनिविदा काढण्यात यावी व सदर निविदा राज्यस्तरीय मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात देण्यात यावी.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगर सचिवांनी प्रकरण क्र. ४८ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ४८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४८ :-**

कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ५० :-**

| | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| अ) | पाणी पुरवठा विभागाच्या दैनंदिन देखभाल / दुरूस्तीसाठी सि.आय. मेकॅनिकल फिटींग खरेदी करणे. | रू. २४,७३,१६९/- |
| ब) | जेसल पार्क मलनिःस्सारण केंद्राची देखभाल / दुरूस्ती करणे. (वार्षिक ठेका) | रू. २०,९४,६००/- |
| क) | पाणी पुरवठा विभागाच्या देखभाल / दुरूस्तीसाठी सी.आय. पाईप खरेदी करणे. | रू. २४,८२,६५२/- |

सबब उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगर सचिवांनी प्रकरण क्र. ४९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ४९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ५१ :-**

महाराष्ट्र शासनाने ३ मार्च २००६ रोजी काढलेल्या अध्यादेश महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा नियंत्रण अध्यादेश २००६ प्लास्टिक २००५/प्र. क्र. ३८/ ता. क्र. ३ अन्वये ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या तयार करणेस, विक्री करणेस, साठवणे, वितरणे करणेस, बंदी घालण्यात आली आहे. या अध्यादेशाची अमंलबजावणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभावीपणे करणेसाठी डिजीटल मायक्रो मिटर खरेदी करणेच्या निविदा महापालिकेने दि. ७.०६.२००६ रोजी 'दै. गावकरी' निविदा नोटीस प्रसिध्द केली होती. त्यास प्रतिसाद मिळून खालील निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या.

| अ. क्र. | निविदाकाराचे नांव | 0.01 mm accuracy असणारे डिजीटल मायक्रो मिटर पुरवठाकरणे कामी सादर केलेले दर (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| १. | हर्ष एन्टरप्रायझेस | रू. ११८६९/- |
| २. | अर्माशीला एन्टरप्रायझेस | रू. १०७४५/- |
| ३. | टुन्स अॅन्ड स्पेअर सर्व्हीस | रू. ११३०७/- |
| ४. | नवीन चंद्र अॅन्ड खुबचंद कंपनी | रू. १०१८२/- |

मे. नवीन चंद्र अॅड खुबचंद कंपनीने डिजीटल मायक्रो मिटर पुरवठा करणेकामी सादर केलेले दर इतर निविदा कारांनी सादर केलेल्या दराच्या तुलनेत सर्वात कमी होते. सदरचे दर मा. आयुक्त यांनी मंजूर केले आहेत. त्यानुसार मे. नवीन चंद्र अॅन्ड खुबचंद कंपनी यांनी १० नग डिजीटल मायक्रो मीटरचा पुरवठा केला आहे. याकामी रू. १,०१८१३.००/- खर्च अपेक्षित आहे.

मा. स्थायी समितीने सदर प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगर सचिवांनी प्रकरण क्र. ५० चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

आपण आता जे टँकर भरतो. आपण त्याचा ठेका दिलेला आहे. त्याची प्रोसिजर काय आहे?

**मा. सभापती :-**

त्याची मुदत कीती आहे? मुदत संपली की चालू आहे ते सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

ते सगळे पॉईंट बंद केलेले आहेत. तिथे टँकर भरत नाहीत. महापालिकेचे फाटकावर जे रु. ३२५/- चे टँकर आहेत. ते चालू आहेत. त्याची वार्षिक निविदा संपल्यानंतर परत येईल. आपण पालिकेच्यावतीने एकच पॉईंट पकडलेला आहे. बाकीचे सगळे पॉईंट टोटली बंद आहेत.

**मिलन पाटील :-**

आपण आता ह्या लोकांना जी मुदत देतो. त्याची तीन दिवसाची मुदत दिलेली आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आता तीन दिवसाची मुदत नसुन एक दिवसाची मुदत दिलेली आहे. आज टँकर आणायचा आणि आजच सोडायचा.

**मिलन पाटील :-**

टँकर कधी गेला आणि कधी आला त्याची रितसर नोंदणी करावी.

**शिवाजी बारकुंड :-**

आज सकाळी टँकरची पावती फाडली तर तो टँकर उद्या न जाता आज संध्याकाळपर्यंत जाणार.

**मिलन पाटील :-**

एक दिवसामध्ये तो तिकडे पोहोचणार का?

**ग्रिटा फॅरो :-**

असे नेहमीच टँकर नेले जातात.

**शिवाजी बारकुंड :-**

जे पाच प्वॉईंट होते जिथे भरायचे ते बंद केले आहेत. फाटकावर पालिकेतर्फे सोसायटीवाले जे काही अर्ज करतात. त्याच्यावर माझा रिमार्क असतो. त्यानंतर पावती फाडून टँकर भरले जातात. फाटकाच्या साईडला सर्वसाधारणपणे १०० ने १२५ टँकर जातात. दुसरीकडे कुठेही टँकर जात नाहीत.

**प्रभात पाटील :-**

आपल्या शहरात पाणी पुरवठा सुरळीत आहे. लोकांना चांगले पाणी मिळत आहे. तुम्ही पाच प्वॉईन्ट बंद केलेले आहेत त्याबद्दल मी पालिकेचे अभिनंदन करते.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याचे जास्त श्रेय मा. उपमहापौर साहेबांना द्यावे लागेल त्याबद्दल त्यांनी त्रास घेतलेला आहे.

**मिलन पाटील :-**

मी तुम्हाला मघाशी पावती दाखवलेली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपण आपल्या महानगरपालिकेच्या टोचणला परमिशन दिलेली असतानासुद्धा श्री. संजय तायशेट्ये टोचणला परमिशन घ्यायची आहे असे सांगतात. आपण मागच्या वेळेला म्हणजे जानेवारी महिन्यामध्ये टोचणला परमिशन दिलेली आहे ती बघा.

**संजय तायशेट्ये :-**

टोचणला अगोदर परमिशन दिलेली नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही टोचणला पूर्वी परमिशन दिलेली नाही असे म्हणता. तुम्ही ह्याच्यामध्ये ती परमिशन बघा. तुम्ही काय निविदा मागितली? ते सांगा.

**संजय तायशेट्ये :-**

आपण त्याला पावती दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही जानेवारी महिन्यामध्ये टोचणला परमिशन दिलेली आहे.

**संजय तायशेट्ये :-**

आपण ह्यांच्या कंपनीला परमिशन दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आता कोणाला परमिशन दिली? आता फेब्रुवारीमध्ये सात महिने झालेले आहेत. तुम्ही अगोदर म्हणजे कधीची गोष्ट करता? तुम्ही या डिपार्टमेन्टला येऊन दोन महिनेच झालेले आहेत.

**संजय तायशेट्ये :-**

ऐरंडे पाटील साहेब या डिपार्टमेंन्टला असताना त्यांच्याकडे त्याबद्दल माहिती दिली होती.

**प्रभात पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब आणि मा. सभापती महोदय मी या ठिकाणी एका वेगळ्या विषयावर बोलते. हा विषय विषयपटलावर नसला तरी आपल्या शहराशी संबंधित आहे. आपल्याला ह्या विषयावर निर्णय घ्यायचा आहे. ह्या विषयावर निर्णय घेतल्याशिवाय मी गप्प राहणार नाही. मी ह्या विषयावर बऱ्याच वेळेला पत्रव्यवहार केलेला आहे. विषय असा आहे की नवघर स्मशानभूमीमध्ये एक व्यक्ती कित्येक वर्षापासून प्रेत जाळण्याचे काम करीत आहे. तिथे ती व्यक्ती लोकांना सहकार्य करते. प्रत्येक स्मशानभूमीमध्ये, प्रत्येक शहरामध्ये नगरपालिकेचे

कर्मचारी असतात. परंतु, नवघर स्मशानभूमीचे असे आहे की तिथे एक माणूस आपले कुटुंब फक्त त्याच्यावर चालवत आहे. त्या माणसाला कोणी काय देत असेल किंवा नसेल ते माहिती नाही. परंतु, तो माणूस स्मशानभूमीतील संपूर्ण स्वच्छता करण्यापासून, लाकडे गोळा करण्यापासून, अस्थी गोळा करण्यापासून सर्व कामे करीत असतो. ज्याच्या घरी ते क्रिया घडत असेल तो त्याच्या हातात काय देत असेल किंवा नसेल त्याच्यावर त्याच्या कुंटुंबाचे गुजराण होते. तुम्ही अशा माणसाला तुमच्या आस्थापनेवर घेऊ शकत नसाल तर तुमच्या ठेक्यावर त्या व्यक्तीला घेऊ शकता. तुम्ही त्या व्यक्तीला उतार वयात का होईना त्याला ॲडजेस्ट करा. तो माणूस आपल्या सगळ्यांची विनामूल्य सेवा करतो. आपण त्याला काहीही देत नाही. तुम्ही त्याला कुठेतरी ॲडजेस्ट करा. तो माणूस त्या स्मशानात कित्येक वर्षे त्या स्मशानात काम करीत आहे. महापालिकेने एक माणूसकीचा दृष्टीकोन समोर ठेवून त्या माणसाची कहाणी स्विकारायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपल्या त्या शंभर लोकांच्या यादीमध्ये त्या माणसाचे नाव द्या.

**प्रभात पाटील :-**

माझ्या मते तुम्ही एका गरीब माणसाला पोसा. या माणसाचे नाव श्री. रामचंद्र भाऊराव पाटील असे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, अजून एक टेम्ब्याला पोस्टमार्टम करणारा श्री. संजय तुकाराम मोहिते हा माणूस आहे. तुम्ही त्याला पालिकेत सामावून घेण्यासारखे काहीतरी करा. ती एकच व्यक्ती आहे. ती व्यक्ती टेम्ब्याला डे-नाईट पोस्टमार्टमचे काम करते. आपण त्या माणसाला अपरात्री फोन केला, तर तो माणूस लगेच पोस्टमार्टमचे काम करून देतो. ह्याच्यामध्ये त्याचासुद्धा समावेश करण्यात यावा.

**गजानन भोईर :-**

आपण त्याचा समावेश करणे हे आपल्यासाठी पुण्याचे काम आहे.

**मिलन पाटील :-**

तो माणूस पोस्टमार्टम करायला सहाय्य करतो असा त्याचा अर्थ झाला.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यावर मा. उपायुक्तसाहेब उत्तर देतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

तो माणूस टेम्बामध्ये दहा वर्षापासून पोस्टमार्टमचे काम स्वतःच करीत आहे.

**गजानन भोईर :-**

मा. उपायुक्त साहेब, त्याच्यावर जी काही कार्यवाही करण्यासारखी आहे ती करा.

**मा. उपायुक्त (मु.) सो :-**

आम्ही त्यांच्या नावाची नोंद घेतलेली आहे.

**प्रकरण क्र. ५० :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ५२ :-**

महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक औषधे पुरवठा करणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून मे. महावीर मेडीकल सप्लायर्स मे. लाधानी मेडीकल सप्लायर्स, मे. लोटस एंटरप्रायझेस या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या. त्यांनी निविदेत खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| Sr. No. | Description | Mahavir Medical Supple | | | Ladhani Medicals | | | Lotus Enterprises | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Packing | Rate | Mfg by | Packing | Rate | Mfg by | Packing | Rate | Mfg by |
| 1. | Tab. Calcium | 1 X 15 | 40.75 | Sandoz | 1 X 15 | 42.25 | Alkem | 1 X 15 | 41.50 | Alkem |
| 2. | Tab. Salbutamol | 1 X 10 | 3.00 | SGS / Atul | 1 X 10 | 3.25 | Atul | 1 X 10 | 3.42 | SGS |
| 3. | Inj. Dexamithasone | 1 X 2 ML | 8.50 | Ranbaxy | 1 X 2 ML | 9.16 | Alkem | 1 X 2 ML | 9.36 | Ranbaxy |
| 4. | ORS Powder | 1 X 21 gm. | 11.50 | Cipla | 1 X 21 gm. | 12.50 | Alkem | 1 X 21 gm. | 12.40 | Win |
| 5. | Syp.Chloroquine 60 ml. | 1 X 60 ML | 11.50 | Endo lab | 1 X 60 ML | 12.25 | Endo Lab | 1 X 60 ML | 12.50 | Endo Lab Endore |
| 6. | Tab. Dicyclomine Hcl | 1 X 10 | 11.00 | Cipla | 1 X 10 | 11.75 | Cipla | 1 X 10 | 11.80 | Cipla |
| 7. | Benzyl Benzoate lotion 400 ml. | 1 X 400 ML | 58.00 | Rajat | 1 X 400 ML | 60.00 | Rajat | 1 X 400 ML | 59.50 | Rajat |

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे. महावीर मेडीकल सप्लायर्स यांनी औषध पुरवठा करणेकामी सादर केलेले दर दोन्ही निविदाकारांच्या तुलनेत कमी आहे. मा. आयुक्त यांनी मे. महावीर मेडीकल सप्लायर्स यांनी सादर केलेली निवीदेतील दर मंजुर केले आहे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मंजुरी दिलेली आहे.

मा. स्थायी समितीने सदर ठरावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा अधिकारी वर्ग यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल त्यांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २:०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**